अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २४.०६.२०२५ | अंक नं. ७३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डद्वारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
+ 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# शहरामधील चेन स्नॅचिंगच्या घटना महिलांसाठी ठरू शकतात जीवघेण्या


## उपाययोजना करण्याची पोलिसांकडे मागणी

नगर - सध्या सोन्याच्या दागिन्यांच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. त्यातच नगर शहर परिसरात चेन स्नॅचिंगच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली आहे. भर वस्तीत रहदारीच्या रस्त्यांवर बिगर नंबरच्या मोटार सायकलवर हे भामटे येतात

(पुढील मजकूर पान २ वर)

## अहिल्यानगर महानगरपालिकेचा नियोजनशून्य कारभारही गुन्हेगारांसाठी ठरतोयं फायदेशीर





या सर्व बाबींमध्ये महापालिकेचा नियोजन शून्य कारभारही कारणीभूत ठरत असून नुकतेच बालिकाश्रम रस्त्यावरील एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र भामट्यानी खेचून नेले, एखाद्या महिलेला अश्या प्रकारातून गळफास बसण्याची वाट पोलिस पाहत आहेत काय? या संपूर्ण बालिकाश्रम रस्त्यावरील महावीरनगर परिसरात महापालिकेने एका वर्षांपासून सुमारे २२ ते २५ विजेचे खांब उभारले असून एक ते दोन खांबावरील स्ट्रीट लाईट वगळता या खांबावर साधे दिवेहि बसविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सर्वत्र अंधार असतो, ही आयती संधी ह्या चेन स्नॅचिंग करणाऱ्या चोरट्याना मिळते. त्यामुळे महापालिका आयुक्तांनी समक्ष येऊन याची पाहणी करून यावर तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी या परिसरातील रहिवाश्यानी केली आहे. अन्यथा आंदोलनाच्या पवित्र्यात आम्हाला उतरावे लागेल असा इशाराही त्यांनी दिला आहे. हा फक्त महावीर नगरचा प्रश्न नसून संपूर्ण शहरातील नागरिकही अश्याच समस्यांना तोंड देत आहेत. पोलीस प्रशासनाने बिगर नंबर प्लेटच्या दुचाकी, पुढाऱ्यांची नावे लावून फिरणाऱ्या दुचाकी, काळ्या फिल्म लावून फिरणाऱ्या चार चाकी यावर तातडीने कारवाई करावी, त्यामुळे अशा चोऱ्यांच्या प्रकारास निश्चितच आळा बसेल. यासाठी पोलीस प्रशासनाने आलेली मरगळ संपवावी व महापालिकेने देखील विविध वॉर्डमध्ये पाहणी केल्यास त्यातही रहिवास्यांच्या अडचणी समजतील, समस्यांचेही निराकरण होईल व खऱ्या अर्थाने आपल्या समाजभीमुखी कार्यास झळाळी येईल असेही या नागरिकांनी म्हंटले आहे.

पाहिजेत
अहिल्यानगर जिल्ह्यातील नामांकित सुवर्णपेढी चंदुकाका ज्वेलर्सच्या अहिल्यानगर शाखेसाठी हवे आहेत.
मॅनेजर जागा 1 (M) | पदवीधर व तत्सम पदावर किमान ५ वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक
कॅशियर जागा 2 (M) | बँक, पतसंस्था येथे कॅशियर म्हणुन काम केल्यास प्राधान्य. टॅली सॉफ्टवेअरचे ज्ञान आवश्यक
सेल्समन जागा 5 (M/F) | तत्सम पदावर काम केल्याचा किमान 2 वर्षे अनुभव आवश्यक
हेल्पर जागा 2 (M/F) | 10वी/12वी पास/नापास
अनुभवींना प्राधान्य, आकर्षक पगार दिला जाईल.
इच्छुकांनी सविस्तर अर्ज बायोडाटा सह 7 दिवसांच्या आत समक्ष भेटावे.
शुध्दता, विश्वासार्हता, पारदर्शकता
चंदुकाका ज्वेलर्स
- सोने, चांदी व हिऱ्याचे व्यापारी -
वसंत टॉकिज रोड, अहिल्यानगर 0241-2321512

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
1 किलो । 500 ग्रॅम । 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर.
(0241) 2343896/2341196

# शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांनी केमिस्ट बांधवांमध्ये भितीचे वातावरण

## पोलीस गस्त वाढवून उपाययोजना करण्याची केमिस्ट असोसिएशनची मागणी



शहर परिसरात चोरीच्या घटना रोखण्यासाठी पोलीस गस्त वाढवून उपाययोजना करण्याची मागणी पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांच्याकडे करताना केमिस्ट असोसिएशनचे पदाधिकारी.


नगर - अहिल्यानगर शहर व तालुक्यात मेडिकल दुकाने फोडून चोऱ्यांचे प्रमाण वाढत असताना सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलीसांची गस्त वाढवून उपाययोजना करण्याची मागणी शहर व तालुका केमिस्ट असोसिएशनच्यावतीने करण्यात आली आहे. संघटनेच्या शिष्टमंडळाने पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांची भेट घेऊन चोरीच्या घटनांपासून मेडिकल व्यावसायिकांना भयमुक्त करण्यासंदर्भात निवेदन दिले.

शहर व तालुक्यात वारंवार मेडिकल फोडण्याचे घटना घडत असल्याचा गंभीर प्रश्नावर लक्ष वेधण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर, सहसचिव मनीषा आठरे, अमित धाडगे, भरत सुपेकर, महेश आठरे, कमलेश गुंदेचा, मनोज खेडकर, खांदवे हर्षल, राकेश ओमासे, कैलास बडे, रवी खिळे, ज्ञानदेव यादव आर्दीसह केमिस्ट बांधव उपस्थित होते.

शहर व नगर तालुक्यात सर्व मेडिकल व्यावसायिक रुग्णांना औषधे उपलब्ध होण्यासाठी अहोरात्र सेवा देत आहेत. सध्या नगर शहर व तालुक्यात चोरीच्या घटना वाढल्या असून, त्यामध्ये मेडिकल फोडण्याचा अधिक प्रमाणात समावेश आहे. नुकतेच दरेवाडी रोड, जामखेड नाका रोड व आनंदऋषीजी हॉस्पिटल परिसरात मेडिकल व्यवसायिकांची अंदाजे सहा ते सात दुकाने फोडण्यात आली. काही ठिकाणी दुकानातील रोख रक्कम व काही औषधी मालाची चोरी करण्यात आलेली आहे. त्यामुळे मेडिकल व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

शहर व नगर तालुक्यात मेडिकल व्यावसायिकांचे दुकान फोडण्याचे प्रमाण वाढले असताना, पोलीस दलाच्यावतीने शहर व नगर तालुक्यात रात्रीची गस्त वाढविण्यात यावी, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून इतर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

बिल्डर्स ना सुवर्णसंधी
पुणे शहरात अत्यंत प्राईम लोकेशनला असलेला,
70 टक्के बांधकाम पूर्ण झालेला प्रोजेक्ट टेक ओव्हर करा व
एका वर्षात गुंतवणुकीवर 40% नफा मिळवा
कमी वेळातच पुणे येथे स्वतःचा ब्रँड स्थापित करण्याची सुवर्णसंधी
100% टक्के लीगल क्लियर, तुम्ही बुकिंग लगेच सुरू करू शकता
ही ऑफर एका कार्पोरेट कंपनीकडून आहे, त्यांना त्यांच्याच इंडस्ट्रीमध्ये गुंतवणुकीच्या काही संधी मिळत असल्याने, ही प्रॉपर्टी विक्रीसाठी उपलब्ध आहे
Location Advantages :
Just 4 km from Pune Airport : ideal for national and international connectivity.
Only 1 km from the Metro Station : excellent accessibility for workforce and clients.
Strategically connected to key residential and business hubs of Koregaon Park, Kalyaninagar, Yerwada, Vimannagar.
actual photo

Project Highlights:
* Fully independent commercial building with a modern design
* Each floor offers 3,800 sq. ft. of premium carpet area
* Total of 10 floors, providing versatile space options
* Suitable for corporate offices, IT parks, co-working spaces, business hotels, showrooms, and more
actual view


For viewing appointments and legal document verification, please contact:
99701 76000
99709 77777
Exclusively Marketed by : SurajRealty Results Speak...

१२ वे पुण्यस्मरण

दिला आपण जीवनमंत्र जगण्याचा
चंदनापरी देह झिजविला
मायेचा वेल पसरविला
मनात ज्ञानदिप लाविला
नयन ओलावली पुण्यस्मरणाला...
स्व. सौ. पुष्पलता लालचंद चंगेडे
स्व. दि. २५/०६/२०१३
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली..
* दुःखांकित *
शिरीष लालचंद चंगेडे - सौ हर्षलता
कु. ओजल श्रेयस चंगेडे
अमित अरविंद मेहेर-सौ. सुजाता
श्रध्दा शिरीष चंगेडे
श्रेयस शिरीष चंगेडे-सौ.स्नेहा
कु.आरुष श्रेयस चंगेडे
सौ.लतिका प्रेमसुख कटारीया
श्रीमती मीना अरविंद मेहेर । सौ. माला अनिल गांधी । सौ. शैला राजेंद्र कांकरिया
समस्थ चंगेडे परिवार
चंगेडे फटाका मार्ट, अ.नगर मो. ९४२२२२५५१४

होलसेल भावात
* स्पायरल पोटॅटोसाठी स्टीक/काडी
* कोरीयर बॅग, नॉन वोवन बॅग, फॅन्सी गिफ्ट बॅग
* दिंडीसाठी पत्रावळी, डिश, द्रोण, युज ॲण्ड थ्रो मटेरीयल
* फुड कंटेनर, अल्यु. कंटेनर
मधुर प्लॅस्टिक
घासगल्ली, अहिल्यानगर

शाळेचा दाखला हरवला आहे
वागळे इस्टेट ठाणे येथील विजयकुमार वैजनाथ साखरे कडा ते नगर प्रवासात दाखला हरवला आहे कोणाला सापडल्यास किंवा आणुन देणाऱ्यास योग्य बक्षीस देण्यात येईल
8419996463

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीने जामीनावर बाहेर येताच फटाक्यांची आतषबाजी करत काढली वाहनांची रॅली



नगर - नगरमधील बहुचर्चित रेखा जरे हत्याकांडातील प्रमुख आरोपी सागर उत्तम भिंगारदिवे यास जामीन मंजूर झाल्यावर त्याने कारागृहाबाहेर येताच फटाक्यांची आतषबाजी करत दुचाकी व चारचाकी वाहनांची सबजेल ते केडगाव वेशीपर्यंत रॅली काढली. त्याचे फोटो व्हिडीओ सोशल मिडीयावर प्रसारित करून जनमाणसात दहशत पसरविण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत कोतवाली पोलिस ठाण्यातील गोपनीय शाखेत काम करणारे पो.कॉ.अनुप झाडबुके यांनी फिर्याद दिली आहे. सागर भिंगारदिवे हा रेखा जरे हत्याकांडातील एक प्रमुख आरोपी असून त्याला न्यायालयाने नुकताच जामीन मंजूर केला आहे. २० जून रोजी तो नगरच्या सबजेलमधून बाहेर आला. त्यावेळी तेथे त्याच्या समर्थकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी करत घोषणाबाजी करण्यात आली. त्यानंतर अनेक अलिशान वाहने व दुचाक्यांची सबजेल ते केडगाव वेशीपर्यंत रॅली काढण्यात आली.

त्या रॅलीतही मोठमोठ्याने आरडाओरडा करत घोषणाबाजी करण्यात आली. त्याचे फोटो व व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल करून समाजमनात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. विना परवाना रॅली काढून जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचा भंग केला. सदरचे फोटो व व्हिडीओ २३ जून रोजी पोलिसांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी ही बाब वरिष्ठांना कळविली. त्यानंतर पो.नि. प्रताप दराडे यांच्या सूचनेनुसार पो.कॉ.अनुप झाडबुके यांनी फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी सागर भिंगारदिवे व त्याच्या ७० ते ८० साथीदारांच्या विरुद्ध बीएनएस कलम १८९, १९०, २२३, २८१, २८५ सह महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७ (१), (३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



### पाऊले चालली... पंढरीची वाट...

चातकाला पावसाची जशी प्रतीक्षा असते तितकीच आतुर ओढ भोळ्या वारकऱ्याला आषाढी एकादशीची असते. आता कोठे धावे मन - तुज चरण देखिले आज - हीच भावना असते या सर्वांची.

किती अन् काय वर्णावा विठुरायाचा अन् पंढरीचा महिमा! हाच आमचा विठ्ठल, ज्याच्या दर्शनासाठी शेकडो वर्षांपासून लाखो वारकरी ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता देहभान विसरून पंढरीला कूच करतो.

हजारो दिंड्या जसं अनेक सरिता सागराला येऊन मिळतात तद्वतच शेकडो दिंड्या आपल्या शहरातून पंढरीच्या भक्तिसागरात जाऊन मिळतात.

अहिल्यानगरीतून शेगावची सुप्रसिद्ध गजानन महाराजांची, नेवाश्यातून ज्ञानेश्वर माऊलींची, नाशिकहून निवृत्तिनाथांची, खान्देशातून मुक्ताईची, तर देवगडची शिस्तप्रिय दिंडी इ. अशा शेकडो दिंड्यांच्या दर्शनासह सेवा, अन्नदान, आरोग्यसेवा व इतर सहकार्याचे पुण्य आम्हां नगरकरांना लाभते.

जिल्ह्याच्याही कानाकोपऱ्यातून अनेक लहानमोठ्या दिंड्या टाळ-मृदुंगाच्या तालात, विठुरायाचे अभंग आळवीत, तुकोबा-ज्ञानोबांची भजने गात पंढरीकडे मार्गस्थ होत आहेत.

विठुरायाची ही आषाढी वारी एक अद्भूत चमत्कारच आहे. साखरादी गोड पदार्थाची नुसती भनक लागली तरी शेकडो मुंग्या कधी व कुठून येतात ते कळत नाही तसेच या दिंड्या, हे वारकरी कसे जमतात, एकत्र येतात हेही कोडं पडतं.

खरंतर ह्या दिंड्या म्हणजे एक आश्चर्यच नाही तर व्यवस्थापनाचं, जीवनाला प्रोत्साहन देणारी वारी म्हणावीच लागेल. १० ते २५ दिवस कोणतीही कुरकुर न करता पण किमान मुलभूत सेवा सुविधांची जमेल तशी तरतूद ठेवून पण त्यासाठी विठुरायावर विश्वास ठेवत ही मंडळी आनंदाने, भक्तिभावाने चालतात. न जाऊ शकणारे त्यांची मनोभावे सेवा करतात. अशा या विठ्ठलनामाच्या शाळेत ज्याला जायला मिळते ते सर्व भाग्यवंतच.. सुखी संसाराची सोडुनिया वाट... पाऊले चालती पंढरीची वाट...

# सारसनगर येथे भरदिवसा घरफोडी करत सोन्या चांदीचे दागिने चोरट्यांनी पळविले

नगर - भरदिवसा बंद फ्लॅटचा कडी कोयंडा व कुलूप तोडून आतील सामनाची उचकापाचक करुन सोन्याचे व चांदीचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना सारसनगर येथील त्रिमूर्ती चौकाजवळील, उषा प्राईड अपार्टमेंट येथे २३ जून रोजी सकाळी ७ ते दुपारी २.३० वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत सौ स्नेहल संतोष कुलकर्णी (वय ३७, रा. फ्लॅट नंबर २०१, उषा प्राईड अपार्टमेंट, त्रिमूर्ती चौकाजवळ, सारसनगर) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या कुटुंबासह कामानिमित्त बाहेर गेलेल्या असताना त्यांच्या बंद फ्लॅटच्या दरवाजाचा कडी कोयंडा व कुलूप अज्ञात चोरट्यानी तोडून आत प्रवेश केला. आतील सामानाची उचकापाचक केली. बेडरुम मधील कपाटातील साहित्य अस्ताव्यस्त फेकले. कपाटाच्या लॉकरचे कुलूप तोडून आतील तीन ग्रॅम वजनाचे चांदीचे पैजण, चार ग्रॅम वजनाचा चांदीचा मोदक, दहा ग्रॅम वजनाचा चांदीचा छल्ला, १५ ग्रॅम वजनाची चांदीची चेन, सोन्याची नथ असा ऐवज चोरुन नेला.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी सौ. स्नेहल कुलकर्णी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस हवालदार नंदकुमार पठारे हे करीत आहेत.

# शहरामधील चेन स्नॅचिंगच्या घटना महिलांसाठी ठरू शकतात जीवघेण्या

(पान १ वरुन)

एखाद्या महिलेच्या गळ्यातील चेन किंवा तिच्या सौभाग्याचे लेणं हिसकावून नेऊन पसार होतात.त्यात अनेक महिला या गंभीर जखमी देखील झालेल्या आहेत. अशा घटनांमध्ये एखाद्या महिलेचा जीवही जावू शकतो. त्यामुळे पोलिस प्रशासनाने तातडीने या चेन स्नॅचिंग गुन्ह्यांना आळा घालावा अशी मागणी शहरातील नागरिकांनी केली आहे.

या संदर्भात काही नागरिकांनी दैनिक नवा मराठा कार्यालयास मेल पाठवून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यात त्यांनी म्हंटले आहे की, आतापर्यंत नगरमध्ये चेन स्नॅचिंगचे सुमारे ७० ते ७५ प्रकार होऊनही पोलीस प्रशासनाला त्याचे काही देणे घेणे नसल्याचे दिसून येत आहे. असे प्रकार वारंवार होत असताना पोलीस प्रशासन मात्र ढिम्मच असल्याचे दिसते. त्यामुळे पहाटे किंवा संध्याकाळी व्यायामासाठी फिरण्यासाठी जाणाऱ्या महिलांमध्ये मोठे भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. यासर्व बाबींवर आळा बसावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. भामट्यांवर दशहत बसावी म्हणून मुख्य रस्त्यांवर पोलीस प्रशासनाने सी.सी टीव्ही कॅमेरे बसविलेले असून त्यातील किती चालू आहेत, याचा काही उपयोग होतो की नाही यावर नागरिक प्रश्न चिन्ह उपस्थित करू लागले आहेत.

# कंपनीच्या पार्किंगमधून मोटारसायकल चोरणारा चोरटा केला जेरबंद

नगर - एमआयडीसी परिसरातील एक्साइड कंपनीच्या पार्किंगमधून मोटरसायकल चोरुन नेणाऱ्या चोरट्यास एमआयडीसी पोलिसांनी अटक करुन त्याच्याकडून चोरीची मोटारसायकल हस्तगत केली आहे. ही कारवाई एमआयडीसी परिसरातील साईबन रोडवर करण्यात आली.

याबाबतची माहिती अशी की विलास बबन तुपे (रा. शिंगवे नाईक ता.नगर) यांची बजाज कंपनीची पल्सर १५० मोटारसायकल (क्र.एम एच १६ बी जे १९५५) २२ जून रोजी दुपारी ३ ते रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान एक्साईड कंपनीचे पार्किंगमधुन अज्ञात चोरट्याने चोरुन नेली होती. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांनी घटना स्थळाचे तांत्रिक विश्लेषण करुन मिळालेल्या माहितीद्वारे हा गुन्हा कृष्णा रविंद्र निबे (रा.भगवतीपुर, कोल्हार ता.नगर) याने केला असल्याचे निष्पन्न केले. तो गुन्ह्यातील मोटारसायकलसह एमआयडीसी भागात साईबन रोडला येणार असल्याची माहीती मिळताच पोलीसांनी त्याचा शोध घेवुन त्यास चोरीच्या मोटारसायकलसह पकडले. त्याचेकडे विचारणा केली असता त्याने हा गुन्हा एकट्यानेच केला असल्याचे कबुल केले.

ही कारवाई स.पो. नि. माणिक चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार राकेश खेडकर, सचिन आडबल, राजु सुद्रीक, रोहोकले, किशोर जाधव, नवनाथ दहिफळे, नागरे, मोबाईल सेलचे राहुल गुंडु यांचे पथकाने केली आहे.



एमआयडीसीतील कंपनीच्या पार्किंगमधुन मोटारसायकल चोरणारा चोरटा पकडल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

# केडगाव औद्योगिक वसाहतीत तरुणाचा खून

### शवविच्छेदन अहवालावरून पोलिसांनी केला खुनाचा गुन्हा दाखल

नगर - केडगाव औद्योगिक वसाहतीत एक अनोळखी तरूणाचा (वय अंदाजे ३० ते ३५) मारहाणीत मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. तरूणाची अद्याप ओळख पटलेली नाही. त्या तरूणाची ओळख पटवून त्याचे मारेकरी शोधण्याचे आव्हान पोलिसांसमोर आले. दरम्यान, तरूणाच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले असून त्याचा मारहाणीमुळे मृत्यू झाला असल्याचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला आहे. त्यामुळे कोतवाली पोलिसांनी अज्ञात मारेकऱ्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांनी फिर्याद दिली आहे. यामध्ये म्हंटले आहे की, २२ जून रोजी सकाळी ७.३० च्या सुमारास पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालणारे पो.कॉ. अर्जुन फुंदे व पो. ना. राजेंद्र आव्हाड यांच्या जवळ असलेल्या डायल ११२ एम डी टी मशीन वर कॉल आला की, इंडस्ट्रियल एरियातील रॉयल इनफिल्ड शोरूमजवळ एक अंदाजे ३० ते ३५ वयोगटाचा तरुण बेशुध्द अवस्थेत पडलेला आहे. ही माहिती मिळताच पोलिस पथक त्या ठिकाणी गेले व त्यांनी रूग्णवाहिकेतून त्याला जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. बोठे यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. डॉ. बोठे यांच्या खबरीवरून पोलीस अंमलदार रमेश शिंदे यांनी कोतवाली पोलिसांना दिलेल्या माहितीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. पोलिस पथक ज्या वेळी घटनास्थळी गेले तेव्हा त्या तरुणाच्या अंगावर मारहाणीच्या जखमा दिसून आल्या होत्या. तसेच तो फक्त अंडरवेअर वर होता. त्यामुळे पोलिसांनी त्याचे शवविच्छेदन करण्यासाठी अर्ज भरून दिला.

त्या तरूणाच्या मृतदेहाचे शवविच्छेदन केल्यानंतर त्याचा मृत्यू मारहाणीत झाला असल्याचा अहवाल कोतवाली पोलिसांना २३ जून रोजी सायंकाळी प्राप्त झाला. त्यामुळे या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांनी सरकार तर्फे फिर्याद दिली. या फिर्यादीनुसार अनोळखी व्यक्तीविरोधात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, घटनास्थळी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर अधीक्षक प्रशांत खैरे, उपअधीक्षक अमोल भारती, कोतवालीचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी भेट दिली असून तपासाबाबत सुचना केल्या आहेत.

## माळीवाडा येथील मटका अड्डयावर छापा

नगर - माळीवाडा येथील शिवम थिएटर परिसरातील एका झोपडीत सुरु असलेल्या मटका अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २३ जून रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास छापा टाकत एकाला पकडले आहे. विष्णु बाबुराव दळवी (वय ७०, रा. देशमुख गल्ली, चौपाटी कारंजा, अ.नगर) असे पकडलेल्या इसमाचे नाव असून त्याच्या कडून रोख रक्कम व कल्याण मटका जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.त्याच्या विरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# केडगाव व लालटाकी परिसरातून दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण

नगर - शहरातील दोन अल्पवयीन मुलींना कोणीतरी अज्ञात इसमांनी कशाचेतरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याच्या घटना शहरातील केडगाव व लाल टाकी परिसरात घडल्या आहेत. याप्रकरणी कोतवाली आणि तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध २३ जून रोजी अपहरणाचे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

केडगाव परिसरातील शिवाजीनगर भागात राहणाऱ्या १७ वर्षीय मुलीस अज्ञात व्यक्तीने कशाचेतरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची घटना १८ जून रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान घडली. अपहृत मुलीच्या घरच्यांनी तिचा केडगाव व नगर शहरात शोध घेतला असता ती कोठेही मिळून आली नाही. त्यामुळे अपहृत मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला.


पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे हे करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत लालटाकी परिसरात राहणाऱ्या १६ वर्षीय मुलीस अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले. अपहृत मुलीचा तिच्या घरच्यांनी लालटाकी परिसर व नगर शहरात शोध घेतला असता ती कोठेही मिळून आली नाही. त्यामुळे तोफखाना पोलीस ठाण्यात अपहृत मुलीच्या बहिणीने दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात इसमाविरुद्ध बी एन एस कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पूनम श्रीवास्तव या करीत आहेत.

## सौ.विद्या वढणे यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील सौ. विद्या वढणे (वय ५२) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दिर, पुतणे असा परिवार आहे.

पत्रकार बद्रिनारायण वढणे यांच्या पत्नी, चि.ओमकार वढणे यांच्या मातोश्री, नंदकिशोर, प्रताप व दत्तात्रय वढणे यांच्या भावजई, मनोज, विवेक व ऋषिकेश वढणे यांच्या चुलती होत.

# चालत्या पिकअप गाडीतून कांद्याच्या बियाणांची चोरी

नगर - शहरातील तारकपूर बसस्टॅन्ड पासून पत्रकार चौकाकडे जाणाऱ्या बोलेरो पिकअप गाडीतून अज्ञात चोरट्याने ३७ हजार ७०० रुपये किमतीचा कांद्याच्या बियाणांचा बॉक्स चोरुन नेल्याची घटना १८ जून रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत नवनाथ भिमराव धाने (वय २९, रा. बोधेगाव, शेवगाव) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे त्यांची बोलेरो पिकअप गाडी ( क्र. एम एच १६ सी सी ७५८८) मध्ये कांद्याच्या बियाणाचे १० बॉक्स घेऊन तारकपूर बसस्टॅन्ड पासून पत्रकार चौकाकडे जात असताना तारकपूर बस स्टँड समोर ट्राफिक जाम असल्याने गाडीचा वेग कमी झाला. त्यावेळी त्यांच्या गाडी मागून मोटारसायकल वर आलेल्या दोघांनी त्यांना सांगितले की तुमच्या गाडीतून कांद्याच्या बियाणाचा बॉक्स कोणीतरी चोरी करुन पळून गेले.

त्यावेळेस फिर्यादी यांनी गाडी थांबवून पाहिले असता गाडीतील दहा बॉक्स पैकी एक बॉक्स कोणीतरी चोरुन नेल्याचे दिसून आले. याबाबत त्यांनी त्यांचे मालक यांना गाडीतून ३७ हजार ५०० रुपये किमतीचे एलोरा कंपनीची कागदी सीलबंद बॉक्समध्ये असलेले १५ पुड्या असलेला कांद्याचे बियाणाचा बॉक्स अज्ञात चोरट्याने चोरुन नेला असल्याचे सांगितले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात नवनाथ धाने यांनी दिलेला फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## इंस्टाग्रामवर महिलेची केली बदनामी

नगर - शहरातील एका ३५ वर्षीय महिलेचे अनोळखी पुरुषांसोबत फोटो मॉर्फ करून ते इंस्टाग्राम या सोशल मीडियावर पोस्ट करुन त्याखाली अश्लील भाषेत मजकूर टाकत महिलेची बदनामी केल्याची घटना २२ जून रोजी घडली.

या बाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात पीडीत महिलेने फिर्याद दिली आहे. या मध्ये म्हटले आहे की संदीप अशोक पवार (वय १९, रा.वंजार गल्ली, कोपरगाव) याने त्याच्या मोबाईल मध्ये संदीप पवार या इंस्टाग्राम आयडी वरुन फिर्यादी व इतर पुरुषांचे फोटो टाकून त्याखाली अश्लील भाषेत मेसेज टाकून फिर्यादीची बदनामी केली. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी संदीप पवार यांच्याविरुद्ध बी एन एस कलम ७८ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## गुलाबबाई बोरा यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - बारातोटी कारंजा येथील रहिवासी गुलाबबाई अंबरचंद बोरा (वय ८९) यांचे २४ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी सलग ६ वर्षे मासखमण केले. मनोज बोरा लॉटरी सेंटरचे संचालक मनोज बोरा यांच्या त्या मातोश्री होत.



## सदाशिव सांगळे यांचे हृदयविकाराने निधन

नगर - येथील गुलमोहोर रोड नरहरी नगर सावेडी येथील रहिवासी सदाशिव पुंडलीक सांगळे (वय ८६) यांचे २३ जून रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, पत्नी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. विनायक सांगळे यांचे ते वडील होत. ते हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक होते.

# रात्रीच्यावेळी संशयितरित्या फिरणाऱ्या दोघांना पकडले

नगर - रात्रीच्या वेळी काहीतरी गुन्हा करण्याचे उद्देशाने तोंडाला रुमाल बांधुन स्वतःचे अस्तित्व लपवुन संशयिरित्या फिरणाऱ्या दोघांना नगर तालुका पोलिसांनी पकडले. ही कारवाई २३ जून रोजी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास नगर तालुक्यातील अरणगाव परिसरातील व्हीआरडीई गेट जवळ करण्यात आली.

नगर तालुका पोलिसांचे पथक रात्री गस्त घालीत असताना अरणगाव जवळील व्हीआरडीई गेट जवळ संशयितरित्या फिरणाऱ्या राजू कासम शेख ( वय ३२, रा. कापूरवाडी, ता.नगर) आणि किरण सुनील साबळे (वय ३४, रा. डोंगरगण, ता. आष्टी, जि. बीड) यांना ताब्यात घेतले. इतक्या रात्री इकडे काय करता अशी विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांना समाधान कारक उत्तरे न मिळाल्याने पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले.

या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार नितीन शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राजू शेख आणि किरण साबळे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गावठी दारु विकणाऱ्यास पकडले

नगर - बेकायदेशीर रित्या गावठी हातभट्टीची दारु विक्री करणाऱ्या एकाला कोतवाली पोलिसांनी पकडून त्याच्या कडून १७ हजार रुपये किमतीची गावठी हातभट्टीची दारु जप्त केली. ही कारवाई सारसनगर जवळील सारस पुल परिसरातील करपेमळा येथे २३ जून रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली

या कारवाईत विठ्ठल गोविंद कपें (वय ३९, रा.करपेमळा, अ.नगर) याच्या विरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'मंगलदिप'च्या कर्जदारास एक महिना कैद आणि ९९,००० हजार रुपये दंडाची शिक्षा

नगर - अहमदनगर येथील अति.मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने कर्जदार वर्षा प्रकाश गर्जे, रा. शिवनगर, अहिल्यानगर हिस निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून १ महिना कैद व ९९,००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास १५ दिवस कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे. वर्षा प्रकाश गर्जे यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने वर्षा प्रकाश गर्जे यांचे विरुद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरून न्यायालयाने कर्जदार वर्षा प्रकाश गर्जे यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी यांची साक्षी महत्वाची ठरली. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता ॲड. सुहास एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना ॲड. अमित अडागळे, ॲड. विजय केदार, ॲड. विलास ढोणे, ॲड. गौरव हरबा, ॲड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.

## पार्किंग मध्ये लावलेल्या महिंद्रा पिकअपची चोरी

नगर - पार्किंगमध्ये लॉक करून लावलेली महिंद्रा कंपनीची पिकअप गाडी (क्रमांक एम एच १६ सी डी ८४०९) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना स्टेशन रोडवरील कोठी परिसरातील श्री दीप हॉस्पिटलच्या पार्किंगमध्ये १२ जून रोजी सायंकाळी घडली.

याप्रकरणी पिकअप चालक अशोक गोरखनाथ बडे (वय ४०, रा. मेहकरी, ता. नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### असे घ्या दूध-तुप मिळेल रुप

दूध आणि तूप सेवन केल्याने शरीराला अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात. दूध आणि तूप दोन्ही रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करतात. तुपामध्ये असलेले ब्युटीरिक ॲसिड हे एक शक्तिशाली दाहक-विरोधी घटक आहे जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. दुधात असलेले प्रथिने आणि जीवनसत्त्वे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढवतात. दूध आणि तूप यांचे मिश्रण त्वचा आणि केसांसाठी देखील खूप फायदेशीर आहे. फॅटी ॲसिड त्वचेला मॉइश्चरायझ करतात आणि ती निरोगी आणि चमकदार बनवतात.

## पाककला

### पुदिना-कोथिंबीर शाही पुलाव

**साहित्य :** २ वाटी बासमती तांदूळ, ३ कांदे उभे चिरलेले, १५ काजू, १५ बदाम, १/४ वाटी किसमिस, १ वाटी पुदिना धुऊन बारीक चिरलेला, एक वाटी कोथिंबीर धुवून बारीक चिरलेली, १० मिरी, २ लवंग, २ वेलची, २ चक्री फुल, २ दालचिनी, १ टिस्पून जीरे, २ तमालपत्र, चवीनुसार मीठ, १ चमचा तेल, २ छोटे चमचे साजूक तूप, १ चमचा मिरी पावडर, तळण्यासाठी तेल

**कृती :** प्रथम बासमती तांदूळ घेऊन पाण्यात भिजत ठेवावा. कढई गॅसवर ठेवून त्यामध्ये तेल घालावे. तेल तापले की सगळे खडे मसाले एक चमचा जीरे घालून छान लाल झालं की त्यात थोडासा कांदा घालावा तो लालसर झाला की त्यात तांदळाच्या दुप्पट पाणी घालून ते छान उकळू द्यावे. त्यामध्ये मीठ घालावे व पाण्यात भिजवलेले तांदूळ घालून भात शिजत ठेवावा. भात शिजला की तो मोकळा करुन ठेवावा. दुसऱ्या गॅसवर कढई ठेवून त्यामध्ये तेल घालावे व कांदा छान तळून घ्यावा त्यातच बदाम, काजू व किसमिस तळून घ्यावेत हे तळलेले कांदे काजू बदाम व किसमिस कोथिंबीर पुदिना थोडंसं मीठ टाकून व मिरी पावडर टाकून एकजीव करावे. हे मोकळ्या केलेल्या भातामध्ये घालून एकजीव करावे व झाकण ठेवून एक वाफ काढावी व काही तळलेले कांदे पुदिना कोथिंबीर व ड्रायफ्रूट्स गार्निशिंगसाठी वापरून हा पुलाव सर्व्ह करावा

## वास्तू

### अडचणीतून निघेल मार्ग

जर तुम्ही अनेक समस्यांनी वेढलेले असाल आणि त्यापासून मुक्ती मिळवू इच्छित असाल, तर रात्री झोपताना उशीखाली मिठाची छोटीशी पुडी ठेवा. मीठ नकारात्मक ऊर्जा दूर करण्याचे काम करते आणि मनाला शांती प्रदान करते. त्यात इतकी नैसर्गिक शक्ती आहे की ते आजूबाजूला असलेल्या नकारात्मक लहरी शोषून घेते. मिठाच्या या उपायामुळे रात्री भयानक स्वप्न पडत नाहीत, आर्थिक अडचणीतून मार्ग सापडतो, दीर्घकाळापासून सुरु असलेला आजार कमी होतो आणि मन शांत, समाधानी आणि प्रसन्न राहण्यास मदत मिळते.

## सल्ला

* आलं लसणाची पेस्ट जास्त काळ टिकण्यासाठी ती बनवताना त्यात थोडं मीठ आणि तेल टाकून हवा बंद डब्यात फ्रिजमध्ये ठेवा.

* फ्रिजमध्ये बेरीज टिकवून ठेवण्यासाठी त्या व्हिनेगरमध्ये बुडवून ठेवाव्या.

## सौंदर्य

* तूप आणि काजळी वापरुन बनवलेले घरगुती काजळ डोळ्यांची काळजी आणि सौंदर्यासाठी वापरावे.

* त्वचा थंड करण्यासाठी आणि केसांना नैसर्गिकरित्या सुगंधित करण्यासाठी चमेलीचे तेल आणि पाणी वापरावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २५ जून २०२५

**दर्श अमावास्या, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, मृग १०।४१, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** सर्व दृष्टिकोनातून वातावरण अनुकूल राहील. व्यासंग उत्तम राहील. उत्साह टिकून राहील. राजकीय क्षेत्रात यश मिळेल.

**वृषभ :** व्यापार व्यवसायाच्या दृष्टीने विचार करता जाहिरात माध्यमांचा वापर करावा लागेल. नोकरदार वर्गाला आपले मत वरिष्ठांना पटवून द्यावे लागेल.

**मिथुन :** आज आपण म्हणाल ती पूर्व दिशा असेल. आपले मत पटवून देण्यात यशस्वी व्हाल. कामातील उत्साह टिकून राहील. भावंडांशी संपर्क साधाल.

**कर्क :** व्यवसायात फायद्याचे प्रमाण चांगले राहील. नोकरदार वर्गाला कामाचा अंदाज येईल. ग्रहमान तुम्हाला साथ देणारे आहे.

**सिंह :** शेजाऱ्यांशी मात्र जेवढ्यास तेवढे राहा. आरोग्य साथ देईल. मित्र-मैत्रिणींशी संपर्क साधाल. संततीचे कौतुक कराल.

**कन्या :** आर्थिकबाबतीत लाभ होईल. महिलांसाठी आपले मत इतरांना पटणारे असेल. आर्थिकबाबतीत अपेक्षित लाभ होईल. शारीरिक, मानसिक स्वास्थ्य बिघडेल.

**तूळ :** नुकसान होणार नाही आणि त्रासही होणार नाही. व्यवसायात उलाढाल वाढलेली असेल. नोकरदार वर्गाचे काम सुरळीत चालू राहील.

**वृश्चिक :** समाजसेवेची आवड राहील. नातेवाईकांच्या भेटीगाठी होतील. कुटुंबाशी एकनिष्ठ राहा. दिवस चांगला असेल. महिला कामाचे व्यवस्थापन नीट कराल.

**धनु :** शांत राहून कामाचा आराखडा तयार कराल. वादविवाद या गोष्टींपासून लांब राहाल.


**मकर :** काळ पाहून निर्णय घेतलेला योग्य राहील. एखादी गोष्ट नाही आवडली तरी ती तुम्हाला करावी लागेल.

**कुंभ :** आर्थिकदृष्ट्या व्यवहार जपून कराल. कुटुंबातील सदस्यांचा आदर कराल. मानसिक ताण येवू शकतो. न झेपणाऱ्या गोष्टींची जबाबदारी घेऊ नका.

**मीन :** महिला गोड बोलून काम करुन घ्याल. म्हणूनच तुम्हाला संयम ठेवावा लागेल. आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहा. प्रकृती जपा. कुटुंबाची काळजी घ्याल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२०६ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२०५ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) अस्थिर; डळमळीत ५) एक समसंख्या; संवत्सरांची संख्या ६) ढीग; चळत; चवड ७) भारताच्या उत्तर दिशेला असलेला एक पर्वत ८) तिसरी तिथी; तृतीया ९) सत्त्व; परीक्षा; चाचणी ११) हातात घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना १३) पालनपोषण करणारे; एक पालेभाजी १४) राक्षसी; डाकीण १६) उवेचे अंडे १८) अगदी सहज; हसतखेळत २०) भस्म; रक्षा २२) आकाश; नभ; गगन २३) संदेश पोहोचविणारा कागद; लेटर

**उभे शब्द :-** १) धागा; सूत; तंतू २) राक्षसी; डाकीण ३) ज्ञान; परिचय ४) मुस्लिमांची प्रार्थना ५) एक दुचाकी वाहन १०) पाढ्यातील सहाची संज्ञा ११) चार शेर धान्याचे पूर्वीचे एक माप १२) क्रीडा; खेळ १३) पाटणा शहराचे ऐतिहासिक नाव १५) व्यर्थ; वायफळ; निरर्थक १७) वाईट; डावा १९) जांभळ्या रंगाचे एक रत्न २१) लंबकर्ण; रासभ; गाढव

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलन : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** चालढकलपणा, आळस आणि निष्क्रियता या गोष्टी स्वप्नपूर्तीमधील सर्वात मोठा अडथळा आहेत.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### गुगलवर हवी तीच माहिती कमी वेळात कशी शोधता येईल?

होय, गूगलवर हवी तीच माहिती कमी वेळात कशी शोधायची यासाठी समजा आपण इनबाउंड विपणनाबद्दलच्या (inbound marketing) साम्रगीसाठी Google वर शोधत आहात. गूगल सर्च बॉक्समध्ये फक्त इनबाउंड मार्केटींग टाइप करण्याऐवजी या वाक्यांशासाठी सुस्पष्टपणे शोध घेण्यापेक्षा तुम्ही चांगले असाल. हे करण्यासाठी, फक्त डबल कोट मध्ये शोध वाक्यांश टायप करा. उदाहरण शोधः इनबाउंड मार्केटिंग समजा आपण इनबाउंड विपणनाबद्दलची सामग्री शोधू इच्छित आहात परंतु आपण जाहिराती या शब्दाचा कोणताही निकाल वगळू इच्छित आहात. हे करण्यासाठी, आपण वगळू इच्छित असलेल्या शब्दासमोर - साइन इन वापरा. उदाहरण शोधः इनबाउंड मार्केटींग - एडव्हर्टायझिंग (-)

डीफॉल्टनुसार, जेव्हा आपण शोध घेता तेव्हा Google शोधात निर्दिष्ट केलेल्या सर्व अटी समाविष्ट करेल. आपण जुळण्यासाठी एक किंवा अधिक संज्ञा शोधत असल्यास आपण ओआर (OR) ऑपरेटर वापरू शकता. (टीप: ओआरचे भांडवल करावे लागेल).

उदाहरण शोधः अंतर्गामी विपणन किंवा जाहिरात (OR)

आपण एखादे वेबपृष्ठ शोधू इच्छित असाल जिथे आपण शोधत असलेली सर्व संज्ञा त्या पृष्ठाच्या मजकूरावर दिसते (परंतु आवश्यक नसून एकमेकांच्या बाजूला), allintext टाईप करा: त्यानंतर शब्द किंवा वाक्यांशाचे अनुसरण करा.

उदाहरण शोध : allintext: व्हरमाँट स्की हाऊस लेक ( : )

आपल्यास आधीपासून माहित असलेल्या वेबसाइटवर आपल्याला समान सामग्रीसह नवीन वेबसाइट्स शोधायच्या असतील तर संबंधित वापरा.

आपल्याला एखाद्या शब्दाची किंवा वाक्यांशाची व्याख्या पटकन पाहण्याची आवश्यकता असल्यास, फक्त परिभाषाः आज्ञा वापरा. आपण मेगाफोन चिन्ह दाबून शब्दाचे उच्चारण ऐकू शकता. आपण विशिष्ट प्रकारचे निकाल शोधत असल्यास आपण मॉडिफायर फाइल प्रकार वापरू शकताः उदाहरणार्थ, कदाचित आपल्याला केवळ इनबाउंड विपणनाशी संबंधित पॉवर पॉईंट सादरीकरणे शोधायची असतील.

उदाहरण शोधः इनबाउंड विपणन फाइल प्रकारः पीपीटी

## शिवभक्त विरमणी

श्रीरामांनी अश्वमेध यज्ञ करण्याचे ठरवले. यज्ञाच्या अश्वाबरोबर शत्रुघ्न, भरताचा पुत्र पुष्कल, हनुमान व इतर वीरांची योजना केली. नर्मदेच्या तटावर फिरत फिरत तो अश्व देवपूरनगरीत पोचला. तेथे वीरमणी राजा राज्य करीत होता. त्याचा मुलगा रुक्मांगद याने अश्वाला पकडले. आपला पिता वीरमणी यांच्यापेक्षा श्रेष्ठ कोण असू शकतो, असे म्हणून याने अश्वाला राजधानीत आणले. राजा शिवभक्त होता. त्याने शिवांना हे सांगितले. शिव त्याला म्हणाले, मी श्रीरामांना दैवत मानतो. तुझ्या मुलाने हे अद्भुत काम केले आहे, तर आता अश्वाचे नीट रक्षण कर. तसेच क्षत्रिय धर्माला जागून शत्रुघ्नाशी लढायला तयार हो. मी तुझ्या पाठीशी आहे.

इकडे नारदांकडून अश्वाचा तपास शत्रुघ्नास लागला. वीरमणी, रुक्मांगद, त्याचा भाऊ शुभांगद इ. सर्व जण सेनेसह युद्धाला सज्ज झाले. घनघोर युद्ध झाले. पुष्कलाच्या एका बाणाने राजा मूर्च्छित पडला. हनुमानानीही बराच पराक्रम गाजवला. आपल्या भक्ताचा असा पराभव होताना पाहून भगवान शंकर युद्धासाठी सिद्ध झाले. नंदी, वीरभद्र यांच्या साह्याने त्यांनी शत्रूच्या सेनेची दाणादाण उडवली. हनुमानाचा पराक्रम पाहून शंकर संतुष्ट झाले. त्यांनी हनुमानाकडून दिव्य औषधी आणवून घेऊन मृत वीरांना जिवंत केले. पुन्हा युद्धाला सुरवात झाली. शेवटी शत्रुघ्नांनी रामाचे स्मरण करताच समोर यज्ञासाठी तयार झालेल्या पुरुषाच्या वेशात रामचंद्र उभे राहिले.

हे पाहताच भगवान शिवाने त्यांचे पाय धरले व म्हटले, माझ्या भक्ताच्या रक्षणासाठी हे युद्ध केले. पूर्वी मी त्याला वर दिला होता, की देवपुरात तुझे राज्य येईल व श्रीरामांचा अश्व तिथे येईपर्यंत मी तुझे रक्षण करीन. यावर श्रीराम म्हणाले,

भक्तांचे पालन करणे हा देवांचा धर्मच आहे. माझ्या हृदयात शिव आहे व शिवाच्या हृदयात मी आहे. आपण दोघे एकरूप आहोत. जो आपला भक्त, तो माझाही भक्त.

रामचंद्राचे वचन ऐकून राजा वीरमणीने त्यांचे दर्शन घेतले, त्यांचा अश्व परत देऊन आपले राज्यही त्यांना अर्पण केले. राम रथात बसून परत गेले. राजा वीरमणी शत्रुघ्नाबरोबर आपली सेना घेऊन निघाला.

## जीवन का अमृत (भाग १)



उसे अभी रूहानियत की क, ख, ग (प्रारंभिक ज्ञान) को समझना है। इसलिए अगर आप अंतर में तरक्की की चाह रखते हैं, तो मैं आपको एक पिता के नाते आदेश देता हूँ, एक अध्यापक के नाते सलाह देता हूँ, एक दोस्त के नाते आपको राजी करता हूँ कि आप अपने आप को बदलें और अपनी मैं पर विजय पायें।

अपने प्रयासों को प्रयास-रहित प्रयास (शरणाई/शरणाई) बनने दें और प्रेमपूर्वक, गुरु शक्ति में पूर्ण आस्था रखकर, ध्यानाभ्यास में समय दें। आत्म निरीक्षण डायरी व्यक्तिगत इस्तेमाल के लिए है और यह छुपी हुई कमियों को सतह तक ले आती है, ताकि

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

हम अपनी कमियों को महसूस करें और उनको एक-एक करके निकाल फेंकें। उनको निकाल फैकने से हमारी ज़िंदगी खुशहाल हो जाएगी और हमारा आध्यात्मिक विकास तेज हो जाएगा।

मुझे यह जानकर खुशी हुई कि कुछ ही दिन पहले हुई मेरी विदेश यात्रा के दौरान आप सत्गुरु की शारीरिक मौजूदगी से बहुत अधिक लाभान्वित हुए। प्रेम से भरी नम्रता और पूर्ण समर्पण, ऐसे उत्तम सद्गुण हैं, जिनके द्वारा पवित्र शिक्षाओं को सही रूप में जीवन में उतारा जा सकता है। सत्गुरु के पवित्र आदेशों का दृढ़ता से अनुसरण करने से अंतर में अनंत खुशी मिलती है, जो कि कई गुणा और बढ़ जाती है, अगर हम इन आदेशों को सावधानी से अपने जीवन का हिस्सा बना लें।

एक सच्चा शिष्य सुख देने वाली आंतरिक शांति का लुत्फ उठाता है। उसमें बहुत सहनशीलता होती है और वह हर प्रकार से संतुलित रहता है।

पिता अपने प्यारे, बच्चों को पवित्र उद्देश्य के लिए कंधे से कंधा मिलाकर, काम करते देख कर हमेशा खुश होता है।

कृपालु गुरु-शक्ति निरंतर सच्चे जिज्ञासुओं और तड़पती रूहों को ढूँढ रही है और उन्हें पवित्र रास्ता दिखा रही है।

आध्यात्मिक जिज्ञासुओं को अपने परिवारों में दुर्लभ सहनशीलता और प्रेममयी सहयोग का विकास करना होगा। आपको अपने पति के प्रति

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

दिमाग का वह हिस्सा जहां हम विचार करते हैं या यह कहें कि अपने आप विचार उठते हैं उसे मन कहते हैं। साधारण शब्दों में विचार ही मन है। दिमाग व आत्मा की वह शक्ति जिस द्वारा हम सुख और दुख का अनुभव करते हैं उसे मन कहते हैं। मन मस्तिष्क में स्थित आत्मा की उस क्षमता को कहते हैं जो मनुष्य को चिंतन शक्ति प्रदान करती है। स्मरण शक्ति प्रदान करती है। निर्णय शक्ति प्रदान करती है। एकाग्रता प्रदान करती है। अन्तर्दृष्टि में सक्षम बनाती है। दिमाग में वह भाग जहां हम तर्क, वितर्क और कुतर्क करते हैं उसे मन कहते हैं। सिर व आत्मा का वह भाग जहां अच्छे या बुरे भाव और भावनायें उठती हैं उसे मन कहते हैं। सिर का वह स्थूल भाग जहां आत्मा में पांच विकार, काम, क्रोध, लोभ, मोह और अहंकार तथा सूक्ष्म विकार आलस्य, अलबेलापन आदि उत्पन्न होते हैं, उसे मन कहते हैं। पीनियल ग्रंथि का वह भाग जहां शांति,

### आज्ञा चक्र

प्रेम, सुख, आनंद और ज्ञान के विचार उत्पन होते हैं और हम महसूस करते हैं उसे मन कहते हैं। दिमाग का वह भाग जब काम करना छोड़ देता है तो मनुष्य की मृत्यु हो जाती है, उसे मन कहते हैं। यही चेतन मन है। इस मन की विशेषता यह है कि यह हर समय विचार करता रहता है। जब से हम जन्म लेते हैं तभी से सोचना शुरु कर देते हैं और जब तक हम मर नहीं जाते हैं तब तक सोचते ही रहते हैं। नींद में भी हम सोचते रहते हैं। बेहोश हो जाने पर भी विचार चलते रहते हैं। मन एक प्रचंड शक्ति है। यहां पर कम्पन के रुप में सूक्ष्म ध्वनियां निकलती रहती हैं। मन पावर प्लांट है। हर विचार को हम विद्युत कण भी कह सकते हैं। विचारों के रुप में विद्युत प्रवाहित होती रहती है, उसे हम प्रयोग करें या ना करें यह हमारे ऊपर है। मन को हम चुम्बकीय शक्ति का कण भी कह सकते हैं। जैसे धरती से चुम्बकीय शक्ति हर समय प्रवाहित होती रहती है। ऐसे ही मन से विचारों के रुप में चुम्बकीय शक्ति हर समय प्रवाहित होती रहती है। मन में उठे हर विचार को रेडियो तरंग भी कह सकते हैं। जिस के द्वारा हम आकाश के किसी भी हिस्से में अपना संदेश भेज सकते हैं। मन को हम समय भी कह सकते हैं। समय की तरह मन हर पल चलता रहता है। मन सूर्य तत्व से बना है। यह जो विचार चलते हैं। उसे हम सूर्य प्रकाश के कण मान सकते हैं। दिमाग तथा शरीर के विभिन भागों तथा सभी कोशिकओं को मन से निर्देश मिलते हैं। मन से ही संदेश अवचेतन तथा अति अवचेतन मन अथवा सूक्ष्म शरीर को प्राप्त होते हैं। यहीं से अवचेतन मन और अति अवचेतन मन से मिले सारे आदेश शरीर को दिये जाते हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगा : काय हो, उकडत असले की तुम्ही काय करता?
पुणेकर : आम्ही कुलरसमोर बसतो
मुलगा : तरीही जास्त उकडतयं असे वाटले तर काय करता?
पुणेकर : मग काय, आम्ही कुलर चालू करतो

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगातील १०० सर्वात शक्तीशाली महिलांच्या यादीत किती भारतीय महिलांचा समावेश आहे?

- ३

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

आपल्या भारतीय संस्कृतीत थोरामोठ्यांच्या जयंतीप्रमाणे प्रत्येकाने आपल्या कुटुंबातील बालकांचे वाढदिवस साजरे करण्याची प्रथा तशी फार पुरातन आहे.

आपल्या कुटुंबातील बालकावर दरवर्षी त्याच्या जन्मदिनी वाढदिवसाचा संस्कार करण्याची खरोखरच आवश्यकता आहे. या मंगल दिवशी त्याला दीर्घायुष्य लाभावे म्हणून श्री कुलदेवता, गणेशाची आराधना व सरस्वतीची आराधना करून पुढीलप्रमाणे संस्कार करावा. बालकाला वाढदिवसाच्या दिवशी सुवासिक तेलाने अभ्यंग करून सुवासिक उटणे लावून स्नान घालावे. त्यानंतर त्याला नवीन कपडे घालावेत. त्याला पाटावर बसवून औक्षण करून ओवाळावे. त्यानंतर दोन्ही हातात अक्षता घेऊन श्रीरामरक्षेतील पहिले नऊ श्लोक (या नऊ श्लोकांत डोक्यापासून

### वाढदिवस कसा साजरा करावा?

पायापर्यंतच्या प्रत्येक अवयवांचा उल्लेख आहे) म्हणून त्या त्या अवयवांवर थोडे थोडे तांदूळ टाकत जावे. समोर श्री कुलदेवतेचा फोटो ठेवावा, नैवेद्य दाखवन कटंबातील सर्वांनी विनंती करावी, की आमच्या बाळाला दीर्घायुष्य, चांगले शिक्षा चांगले आरोग्य देऊन त्याचा नावलौकिक संपूर्ण विश्वात होऊ दे आणि हे देवा! तुझे आशीर्वाद त्याच्या पाठीमागे सदैव असू देत.

त्यानंतर जमलेल्या बालगोपाळांना व इतर नातेवाइकांना वाढदिवसानिमित्त तयार केलेले पदार्थ खायला द्यावेत. सहसा भेटवस्तू कोणाची स्वीकारू नये. उलट आपणच त्याच्या मित्रांना छोटेसे का होईना, रिर्टन गिफ्ट द्यावे. इतक्या साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा करावा. मोठमोठ्या हॉटेलमध्ये भरपूर मित्रपरिवार बोलावून वाढदिवस साजरा करण्याची खरंच गरज नाही.

भपकेबाजपणाला महत्त्व न देता आपल्या मुलाला आजच्या दिवशी ज्याच्यात आनंद मिळेल ते करावे. त्याच्या मित्रांना बोलावून घरातील सर्व खेळणी त्यांना खेळण्यास द्यावी. त्याच्या आवडीची बडबडगीते त्यांना म्हणायला लावावीत. छोटीशी अंताक्षरी स्पर्धा ठेवून जो जिंकेल त्याला भेटवस्तू द्यावी.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



अहिल्यानगर अस्थिरोग संघटना व महाराष्ट्र अस्थी रोग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने मणक्यांच्या आजारासंबंधी आधुनिक उपचार या धर्तीवर चर्चासत्र व उपचार पद्धती सुधारण्याच्या कार्यशाळेप्रसंगी उपस्थित अस्थिरोग तज्ञ (छाया – समीर मन्यार)

# नेव्हिगेशन टेक्नॉलॉजी व रोबोटचा वापर करून मणक्यातील शस्त्रक्रिया सोप्या करता येतील

**डॉ. राहुल पंडित यांची माहिती; मणक्यांच्या आजारावर चर्चासत्र व कार्यशाळा**

नगर – अहिल्यानगर येथील मणक्याच्या गंभीर आजाराने त्रस्त असणाऱ्या रुग्णांना यापुढे पुणे, मुंबई अशा शहरात जायची गरज पडू नये व त्यांना येथेच सवलतीच्या दरात उंच तंत्रज्ञान युक्त ट्रीटमेंट मिळावी. नेव्हिगेशन टेक्नॉलॉजी आणि रोबोटचा वापर करून मणक्यातील शस्त्रक्रिया सुखकर आणि सोप्या करता येतील आणि त्यामुळे निश्चित रुग्णांना खूप फायदा होईल. दुर्बिणीने होणाऱ्या मणक्याच्या शस्त्रक्रिया या सर्व अस्थीरोग तज्ञांनाही करता याव्यात त्यामुळे सर्व रुग्णांना त्याचा लाभ घेता यावा हा मूळ उद्देश चर्चासत्र घेण्याचा असल्याचे महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेचे एक्झिक्युटिव्ह कमिटी मेंबर व अस्थिरोग तज्ञ डॉ. राहुल पंडित यांनी कार्यशाळेची सविस्तर माहिती देताना म्हणाले

अहिल्यानगर अस्थिरोग संघटना व महाराष्ट्र अस्थी रोग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने मणक्यांच्या आजारासंबंधी आधुनिक उपचार या धर्तीवर चर्चासत्र व उपचार पद्धती सुधारण्याच्या अनुषंगाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात महाराष्ट्र राज्यातील शंभर अस्थिरोग तज्ञांनी सहभाग नोंदविला व आधुनिक उपचार पद्धतीचे मार्गदर्शन घेतले.

चर्चा सत्रासाठी मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथून मणके शास्त्रात तज्ञ असलेल्या आठ अस्थिरोग तज्ञांनी साधारण उपचारापासून अत्याधुनिक उपचारापर्यंत सर्व प्रकारचे मार्गदर्शन केले. तसेच मणक्याचे जटिल शस्त्रक्रिया करण्यासाठी लागणारे स्क्रू आणि रॉड यावर कार्यशाळा घेऊन सॉ बोन वर्कशॉप घेण्यात आले.

महाराष्ट्राचे अस्थिरोग संघटनेचे अध्यक्ष डॉ. संपत डुंबरे व सचिव डॉ. अभिजीत वाहेगावकर यांनी राज्य पातळीवर अशा प्रकारच्या चर्चा सत्राचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

अहिल्यानगर अस्थिरोग संघटनेचे अध्यक्ष डॉ. संतोष चेडे व सचिव डॉ. आशुतोष जोशी यांनी या नियोजन केले व परिश्रम घेतले. आय एम ए चे माजी अध्यक्ष व अस्थिरोग तज्ञ डॉ. शंकर शेळके यांनी आभार मानले.

# ‘न्यूरॉन हॉस्पिटल’मध्ये अवेक क्रेनिओटॉमीने महिला रूग्णाच्या मेंदूतील ‘ट्युमर’ काढला

**न्यूरो सर्जन डॉ.अमोल कासवा यांची कामगिरी, रूग्णाला पूर्ण भूल न देता मेंदूतील ट्युमर काढला**





नगर – सावेडी रोडवरील न्यूरॉन प्लस हॉस्पिटलमध्ये अवेक क्रेनिओटॉमीची यशस्वी शस्त्रक्रिया करण्याची कामगिरी न्यूरो सर्जन डॉ.अमोल कासवा यांनी नुकतीच केली आहे. २५ वर्षीय एका महिलेवर ही अतिशय गुंतागुंतीची शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

डॉ.अमोल कासवा यांचा अवेक क्रेनिओटॉमीमध्ये हातखंडा आहे. काही दिवसांपूर्वी हॉस्पिटलमध्ये एक २५ वर्षीय महिला रूग्ण आली होती. तिला सातत्याने फिटस येत होत्या. एमआरआय तपासणीत तिच्या उज़व्या मेंदूत ट्युमर असल्याचे निदान झाले. उज़व्या बाजूच्या मेंदूव्दारे शरीराच्या ड़ाव्या हातापायांचे नियंत्रण होते. अशावेळी शस्त्रक्रिया करायची म्हटले तर रूग्ण पूर्ण शुध्दीत असणे गरजेचे असते, अन्यथा सर्वसाधारणपणे मेंदूतील ट्युमरच्या शस्त्रक्रिया भूल देऊनच केल्या जातात. सदर महिला रूग्णाची परिस्थिती पाहता डॉ.कासवा यांनी अवेक क्रेनिओटॉमी शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. रूग्ण व रूग्णाच्या नातेवाईकांना याची पूर्ण कल्पना देण्यात आली. अतिशय किचकट आणि सर्जनच्या कौशल्याची परीक्षा पाहणारी ही शस्त्रक्रिया असते.

डॉ.कासवा यांनी सदर महिला रूग्णाला विश्वासात घेऊन शस्त्रक्रिया सुरु केली. तिला कोणत्याही प्रकारची भूल देण्यात आली नव्हती. एकीकडे तिच्याशी संवाद साधत आणि दुसरीकडे कौशल्याने मेंदूतील ट्युमर काढण्याची कामगिरी डॉ. कासवा यांनी केली. ट्युमर काढताना मेंदूतील नियंत्रण केंद्राला धक्का पोहचणार नाही याची पूर्ण काळजी घेण्यात आली. ही शस्त्रक्रिया पूर्ण यशस्वी झाल्याने रूग्ण महिलेचा फिटचा त्रास कमी झाला तसेच संभाव्य पक्षाघातही टळला.

या शस्त्रक्रियेबाबत डॉ.अमोल कासवा यांनी सांगितले की, मेंदूवरील शस्त्रक्रिया करताना रूग्णाला पूर्णपणे भूल दिली जाते. अवेक क्रेनिओटॉमीमध्ये शस्त्रक्रिया करायची तेवढाच भाग बधिर केला जातो, बाकी रूग्ण पूर्णपणे शुध्दीवर व सावध असतो. शस्त्रक्रिया चालू असताना रूग्णाशी सातत्याने बोलत होतो. तिलाही बोलते करीत होतो. कुठे काही वेगळे जाणवत आहे का, ही विचारणा करीत होतो. अखेर ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली व एका रूग्णाला नवीन जीवन देता आल्याचा आंनद झाला. या शस्त्रक्रियेवेळी भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. भूषण लोहोकरे यांनी काम पाहिले. शस्त्रक्रियेचे गुंतागुंतीचे स्वरूप पाहता ’इलेक्ट्रो फिजिओलॉजिकल मॉनिटरींग’साठी अहमदाबाद येथील तज्ज्ञ उपस्थित होते. न्यूरॉन प्लसचे मुख्य वैद्यकीय संचालक डॉ. मुकुंद विधाते व डॉ. अविनाश गाडेकर यांनी डॉ. कासवा यांचे कौतुक केले आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये २७ जून रोजी मोफत दंतरोग तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी म.सा. हॉस्पिटलमध्ये २७ जून रोजी सकाळी १० ते २ या वेळेत मोफत दंतरोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. दंतरोग तज्ज्ञ डॉ.अर्पणा पवार, डॉ.प्राची गांधी आणि ओरल सर्जन डॉ.स्वराज ठोले यावेळी शिबिरार्थींची तपासणी करणार आहेत.

शिबिरात मेटल कॅप (१००० रूपये), सिरॅमिक कॅप (१५०० व २५०० रूपये), रूट कॅनल (२००० ते ३००० रूपये), दात साफ करणे आणि दातांमध्ये सिमेंट भरणे (५०० रूपयांपासून पुढे), दातांची कवळी बसवणे (८०००, १००००, १४००० व २०००० रूपये), इम्प्लांट (१३५०० रूपये पासून सुरू) असे अत्यंत कमी किंमतीत केले जाईल. औषधांचा खर्च वेगळा असेल. शिबिराचा लाभ घेण्यासाठी ९४०४४७२१९९ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधून नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

हॉस्पिटलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रूपये, सिटी स्कॅन १२५० रूपये, एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. तसेच महावीर भवन येथे रूग्ण आणि रूग्णांचे नातेवाईकांसाठी ३५ रूपयात भोजन सुविधा उपलब्ध आहे. २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब आणि ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सुविधा उपलब्ध आहे.

दंतरोग मोफत तपासणी शिबीराचा अधिकाधिक गरजूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन जैन सोशल फेडरेशनतर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१–२३२०४७३/७४/७५

# सामाजिक जाणिवेतून रक्तदानाचे महान कार्य

**जितेंद्र झंवर यांचे प्रतिपादन**

नगर – आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे देणे लागतो. याप्रमाणे श्री माहेश्वरी युवक मंडळाचे सर्व कार्यकर्ते दरवर्षी शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करतात. ही कौतुकास्पद बाब आहे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदान केल्याने अनेकांचे प्राण वाचतात. वांबोरी या गावांमध्ये माहेश्वरी युवक मंडळ व आर्ट ऑफ लिविंग यांच्या सहयोगाने आजपर्यंत २० रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली असून २२०० रक्त पिशव्यांचे संकलित करण्यात आले आहेत. सामाजिक जाणवेतून होणारे रक्तदानाचे कार्य महान असे आहे, असे प्रतिपादन श्री माहेश्वरी युवक मंडळाचे जितेंद्र झंवर यांनी केले आहे.



वांबोरी येथे श्री माहेश्वरी युवक मंडळाच्यावतीने शिबिरात १३८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

**श्री माहेश्वरी युवक मंडळाचा पुढाकार १३८ रक्तदात्यांचे रक्तदान**

वांबोरी येथे श्री माहेश्वरी युवक मंडळाच्यावतीने शिबिरात १३८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे प्रसंगी जितेंद्र झंवर, सौ.अंचला झंवर, महेश भराडीया, सौ.सुवर्णा मुथ्था, सौ.शुभांगी चौधरी, सौ.जयश्री अष्टेकर, डॉ.योगेश पानसरे, अजिंक्य तुपे, रवींद्र उंडे, विजय चौधरी, विजय झंवर आदींनी रक्तदान केले.

महेश भराडीया म्हणाले, साधारणपणे एप्रिल, मे व ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात रक्ताचा तुटवडा असतो तेव्हा आवर्जून वर्षातून तीन वेळा शिबीरे आयोजित केले जातात. प्रत्येक शिबिरात १०० ते १२० रक्तदाते रक्तदान करतात. अनेक रक्तदाते दरवेळेस रक्तदान करतात व सोबत कुटुंबातील सदस्य, मित्र परिवार यांनाही सोबत घेऊन येतात.

सौ. अंचला झंवर म्हणाले, दरवर्षी माहेश्वरी युवक मंडळाच्या माध्यमातून हिमोग्लोबिन तपासणी शिबिरे, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, गावातील प्रत्येक शाळांमध्ये किशोर वयीन मुलींसाठी लेक्चर, वयात येणाऱ्या मुला मुलींसाठी डॉक्टरांचे मार्गदर्शन शिबिरे, नाडी परीक्षण कॅम्प, आयुर्वेद नॉलेज कॅम्प, आणि महिलांकरिता आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन असे विविध उपक्रम राबवत असतात. वांबोरी गाव आणि परिसरातील रक्तदात्यांचे व जनकल्याण रक्तकेंद्राचे अनेक वर्षापासून अतूट नाते निर्माण झाले आहे. गावातील नागरीकांना, गरजू रुग्णांना वेळेवर उपलब्ध होत आहे.

डॉ.वसंतराव झेंडे म्हणाले, माहेश्वरी समाजाचे रक्तदान शिबिराच्या माध्यमातून मोठे सामाजिक योगदान होत आहे. वांबोरी येथे या शिबिरासाठी जितेंद्र झंवर, सौ. अंचला झंवर व महेश भराडीया यांनी परिश्रम घेतले आहे.

संकलनाचे कार्य जनकल्याण रक्तकेंद्राचे डॉ.वसंतराव झेंडे, सोनाली खांडरे, विनिता धामणगावकर, मनीषा जोशी, योगीराज अरवेल, किरण शिंदे, मेघा शिंदे, पूजा प्रधान आदींनी केले आहे.



किर्लोस्कर कंपनीच्या वतीने वर्धापन दिनानिमित्त आयोजित शिबिरात १६५ कामगारांनी रक्तदान केले.

# निस्वार्थपणे केलेले रक्तदान हे पुण्यकर्मच

**चैतन्य शिंदे यांचे प्रतिपादन; किर्लोस्कर कंपनीच्या वर्धापनदिनी १६५ कामगारांचे रक्तदान**

नगर – किर्लोस्कर कंपनीच्या वतीने दरवर्षी वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात येते. कंपनीचे सर्व कामगार सामाजिक कार्यात सहभागी होत असतात. कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागाने १६५ रक्तपिशव्यांचे संकलन झाले आहे. ही समाधानकारक बाब आहे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदानाने अनेकांचे प्राण वाचतात. निस्वार्थपणे केलेले रक्तदान हे पुण्यकर्मच आहे, असे प्रतिपादन प्लांट हेड चैतन्य शिंदे यांनी केले आहे.

एमआयडीसी येथील किर्लोस्कर कंपनीचा वर्धापन दिन व उद्योजक कै.लक्ष्मणराव किर्लो स्कर यांचा १५६ वा जन्मदिना निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. या शिबिरात सामाजिक बांधिलकी जपून १६५ कामगारांनी रक्तदान केले. याप्रसंगी कॅम्प संयोजक अमोल तोरणे, प्लांट हेड चैतन्य शिंदे, एचओडी प्रशांत शिंदे, अतुल भोसले, काशिनाथ कोकणे, राजेंद्र बोगम, विकास जोशी, जनकल्याण रक्तकेंद्राचे कार्यवाह सतिश इंदाणी, प्रशासकीय अधिकारी सागर उंडे, डॉ.ओजस मुनोत, जनसंपर्क अधिकारी शरद बळे, अमित टकले उपस्थित होते.

रक्तदानाच्या कार्याबद्दल जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने किर्लोस्कर कंपनीचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन विशेष गौरव करण्यात आला.

रक्त संकलनाचे कार्य जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने करण्यात आले.

# मोठा जमाव जमवून दर्गा ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरु

**संरक्षण द्यावे; मुस्लिम समाजाचे जिल्हाधिकारी यांना निवेदन; २५ व २६ जून रोजी जमाव घेऊन दर्गावर येणाऱ्यांना रोखावे**



पाथर्डी तालुक्यातील मौजे जवखेडे खालसा येथे पीर बाबा रमजान दर्गा उर्फ कान्होबा येथे बेकायदेशीरपणे काही विघ्नसंतोषी लोक एकत्र येऊन धार्मिक द्वेष पसरविण्याच्या उद्देशाने गैरकृत्य करणार असल्याने त्यांना रोखण्याची मागणी जवखेडे खालसा मधील समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

नगर – पाथर्डी तालुक्यातील मौजे जवखेडे खालसा येथे २५ व २६ जून रोजी पीर बाबा रमजान दर्गा उर्फ कान्होबा येथे बेकायदेशीरपणे काही विघ्नसंतोषी लोक एकत्र येऊन धार्मिक द्वेष पसरविण्याच्या उद्देशाने गैरकृत्य करणार असल्याने त्यांना रोखण्याची मागणी जवखेडे खालसा मधील समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. दर्गात येऊन मुजावर यांना धमकावून आरती करण्याचा प्रयत्न सुरु असल्याचा आरोप करण्यात आला आहे. कोणत्याही समाजाच्या धार्मिक भावना दुखावणार नाही व कोणतीही विपरीत घटना घडणार नाही, यासाठी प्रशासनाने योग्य भूमिका घेण्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.


पाथर्डी तालुक्यातील मौजे जवखेडे खालसा येथे पीर बाबा रमजान दर्गा उर्फ कान्होबा आहे. या दर्गाच्या दिवा बत्तीसाठी मुस्लिम समाजाला पिढ्यानपिढ्या दीडशे वर्षापासून इनामी जमिनी मिळालेली आहे. शासनाच्या गॅजेटमध्ये देखील तसा उल्लेख असून, ॲलिनेशन रजिस्टरला याबाबतची नोंद आहे. परंतु गावातील काही विघ्नसंतोषी लोक यामध्ये राजकारण करून तीन वर्षापासून दर्गावर येऊन दमबाजी करण्याचा प्रयत्न करीत आहे. समाजात जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असून, मुस्लिम समाजातील मुजावर यांना सदर दर्गातून शिवीगाळ करून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करत आहे. प्रत्येक गुरुवारी सकाळी दर्गावर येऊन आरती करण्याच्या उद्देशाने मुस्लिम समाजाचे मुजावर यांना दमबाजी करुन दर्गाबाहेर काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. गावात मुस्लिम समाज अल्प असून, त्यांच्यात भीतीपूर्ण वातावरण निर्माण करण्यात येत आहे. दर्गावर असलेला हिरवा झेंडा काढून, मजारवर भगवी चादर टाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आला आहे.

या दर्गावर कधीही आरती झालेली नसून, दर्गावर आरती करण्याच्या उद्देशाने चिथावणी देऊन जमाव जमविण्याचा प्रयत्न सुरु आहे. १९ जून रोजी दर्गातील मुजावर यांना मारहाण करण्यात आली होती. याप्रकरणी पाथर्डी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दोन्ही समाजाची बैठक घेतली, मात्र मुस्लिम समाजावर दबाव टाकण्यात येत आहे. जातीय द्वेष पसरविण्यासाठी युवकांची माथी भडकविण्याचे काम सुरु आहे. प्रशासन देखील यासंदर्भात सहकार्य करत नसून, विघ्नसंतोषी लोक दर्गाचा ताबा घेण्याचा प्रयत्न करत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

२५ व २६ जून रोजी पीर बाबा रमजान दर्गा येथे जमाव जमवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. यासाठी विघ्नसंतोषी लोकांना गैरकृत्य करण्यापासून रोखण्याची मागणी मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी भैय्या शेख, शाहिद पठाण, परवेज अशरफी, फिरोज शेख, हुसेन शेख, शफिक शेख, शाकीर शेख, असिफ शेख, इरफान शेख, अन्वर शेख आदी उपस्थित होते.

# शिक्षण प्रवासात तुम्ही कोणतेही क्षेत्र निवडा, पण त्यात उत्कृष्ठतेचा ध्यास ठेवा

**आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार**



तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

नगर – तिळवण तेली समाज ट्रस्टतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार हा एक अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. शिक्षण हे केवळ गुण मिळवण्यासाठी नसून, व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी आणि समाजात आपले स्थान निर्माण करण्यासाठी असते. तुम्ही सगळे गुणवंत विद्यार्थी समाजाची शान आहात. आजचा हा सत्कार तुम्हाला केवळ प्रोत्साहन देणारा नसून, तुमच्यावर अधिक जबाबदारी टाकणारा आहे. यशाच्या शिखरावर पोहोचण्यासाठी कठोर परिश्रम, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन हे आवश्यक आहेत. या पुढील शिक्षणप्रवासात तुम्ही कोणतेही क्षेत्र निवडा, पण त्यात उत्कृष्ठतेचा ध्यास ठेवा. देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी तरुणांची आवश्यकता आहे आणि त्यासाठी तुम्ही स्वतःला सक्षम बनवा. तिळवण तेली समाजातील नव्या पिढीकडून मोठ्या अपेक्षा आहेत. समाजाने दिलेलं हे प्रेम आणि सन्मान लक्षात ठेवून तुम्ही समाजासाठी, देशासाठी काहीतरी देणं लागतो या भावनेने पुढे चला, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, माजी नगरसवेक सचिन जाधव, तैलिक महासभाचे जिल्हाध्यक्ष रमेश साळुंके, विजय दळवी, प्रमोद डोळसे, ह.भ.प.रामदास महाराज क्षिरसागर, गोकुळ काळे, ट्रस्टच्या अध्यक्षा सौ.निता लोखंडे, उपाध्यक्षा शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर, खजिनदार प्रकाश सैंदर, विश्वस्त सागर काळे, प्रसाद शिंदे, गोकुळ कोटकर, दत्तात्रय डोळसे, मनोज क्षिरसागर, ओंकार लोखंडे, वैभव शिंदे, कैलास कर्पे, गणेश दहितुळे, दिपाली डोळसे, योगेश भागवत, श्रीकांत भागवत, विकास काळे, अंबिका भिसे, अर्जुन डोळसे आदि उपस्थित होते.

नानासाहेब जाधव म्हणाले, पालक व मुलांमधील संवाद मोबाईलमुळे कमी होत चालला आहे. मोबाईल जसा गरजेचे आहे, तसा घातकही आहे, त्याचा उपयोग कामापुरताच झाला पाहिजे. शालेय जीवनात मार्क कमी मिळाले तरी स्पर्धा परिक्षांच्या माध्यमातून तुम्ही यशस्वी होऊ शकता. पालकांनी मुलांच्या कलेने घेऊन त्यांना आवडत्या क्षेत्रात करिअरची संधी द्या, म्हणजे भविष्यात ते नक्कीच यशस्वी होतील, असे सांगितले.

सचिन जाधव यांनी आज प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करुन त्यादृष्टीने नियोजन केले पाहिजे. आज १०वी व १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांना आपले गुणवत्तेनुसार अनेक संधी आहेत. आपण कशात यशस्वी होऊ शकते हे ठरवून त्या क्षेत्रात आपले करिअर करावे. स्पर्धा परिक्षेतील प्रश्न हे आपण शाळेत घेतलेले शिक्षणाशी संबंधित असतात त्यामुळे शालेय शिक्षण महत्वाचे आहे.

निता लोखंडे यांनी ट्रस्टच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. प्रास्ताविक उपाध्यक्षा शोभना धारक यांनी केले. सूत्रसंचालन अक्षदा लोखंडे यांनी केले. सचिव शशिकांत देवकर यांनी आभार मानले. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

# धनादेश न वटल्याने आरोपीस ६ महिने शिक्षा व ६,९९,००० रुपये दंड व नुकसान भरपाई देण्याचा आदेश

नगर – अहमदनगर येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी डी. डी. कर्वे यांनी आरोपी मे सुजल ट्रेडर्सचे भागिदार महेश गुप्ता व मिता महेश गुप्ता यांना दोघांना ६ महिने शिक्षा व ६,९९,००० रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना साधी कैद अशी शिक्षा न्यायालयाने सुनावली.

अहमदनगर येथील सुजल ट्रेडर्स या फर्मने नगर अर्बन को. ऑप बँक या बँकेकडुन कर्ज घेतले होते. सदर कर्जाच्या परतफेडीपोटी भागिदार या नात्याने आरोपी महेश गुप्ता व मिता महेश गुप्ता यांनी रक्कम रुपये ४५,४४४० चा चेक दिलेला होता सदर चेक न वटता परत आल्यामुळे सन २०१९ मध्ये सदर आरोपी विरुध्द अर्बन बँकेने फौजदारी केस दाखल केलेली होती. सदर केसमध्ये गुणदोषावर चौकशी होवून आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत झाल्यामुळे, आरोपीस वरीलप्रमाणे मे. कोर्टाने शिक्षा सुनावली आहे.

सदर केसमध्ये फिर्यादीच्या वतीने ॲड. प्रदिप एम. भंडारी, ॲड. रोहित भंडारी यांनी काम पाहीले त्यांना ॲड. मनिषा मळेगावकर यांनी सहकार्य केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# रस्त्यावर बेशिस्तपणे व नो पार्किंग झोनमध्ये लावलेली वाहने टोविंग व्हॅनमार्फत जप्त करा

**प्रशासनाचे पे अॅण्ड पार्कच्या ठेकेदार संस्थेला आदेश; वाढत्या रहदारीबाबत पोलिस प्रशासन, महामार्ग प्राधिकरणाशी चर्चा करणार : आयुक्त यशवंत डांगे**



नगर – महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरात पे अॅण्ड पार्क सुरू करण्यात आले आहे. त्यासाठी खासगी संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. शहरातील वाहतुकीला व पार्किंगला शिस्त लागावी, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. शहरात काही ठिकाणी पे अॅण्ड पार्क सुरू करण्यात आले आहे. काही ठिकाणी नो पार्किंग झोन करून तेथे फलकही लावले आहेत. अशा नो पार्किंग झोनमध्ये लावलेली वाहने व बेशिस्तपणे लावलेली वाहने टोविंग व्हॅनमार्फत कारवाई करून जप्त करावी, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, असे स्पष्ट आदेश आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी ठेकेदार संस्थेला दिले आहेत.

शहरातील रस्त्यांवर पे अॅण्ड पार्कच्या अंमलबजावणीसाठी रस्त्याच्या दुतर्फा जागा निश्चित करून दिलेल्या आहेत. तसेच, नो पार्किंग झोनही निश्चित केलेले आहेत. या नो पार्किंग झोनमध्ये नागरिक वाहने लावत आहेत. विशेषतः प्रोफेसर चौक येथे चौपाटीवर येणारे ग्राहक अस्ताव्यस्त वाहने लावत आहेत. तसेच, झोपडी कॅन्टीन ते टीव्ही सेंटर रस्त्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाहने लावली जात आहेत. या ठिकाणी नो पार्किंग झोन आहे. बेशिस्त पार्किंगमुळे व नो पार्किंगमध्ये लावलेल्या वाहनांमुळे रहदारीला अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे अशा वाहनांवर महानगरपालिकेमार्फत कारवाई केली जाणार आहे. बेशिस्तपणे व नो पार्किंग झोनमध्ये लावलेली वाहने टोविंग व्हॅनमार्फत जप्त करून सदर वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करावी, असे आदेश यशवंत डांगे यांनी दिले आहेत.

दरम्यान, बायपास रस्त्यावर टोल आकारणी सुरू झाल्याने मनमाड महामार्ग, छत्रपती संभाजीनगर महामार्ग, कल्याण रोड, सोलापूर व दौंड महामार्गाकडे येणारी व जाणारी वाहने शहरातून प्रवेश करत आहेत. त्यात अवजड वाहनांसह चारचाकी वाहनांची संख्या मोठी आहे. ही रहदारी वाढल्याने शहरातील महामार्गावर वाहतूक कोंडीची समस्या वाढत आहे. त्यामुळे शहरातून होणारी अवजड वाहतूक बायपास रस्तामार्गे वळवावी, यासाठी पोलिस प्रशासनाची भेट घेऊन चर्चा करणार आहे. तसेच, बायपास रस्त्यावर चारचाकी वाहनांना टोल माफ केल्यास शहरातील रहदारीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. त्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा करणार असल्याचेही यशवंत डांगे यांनी सांगितले.

# नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांना जुलैमध्ये ५० टक्के रकमा मिळण्याचा मार्ग मोकळा

**अवसायक गणेश गायकवाड यांची माहिती**

नगर – पाच लाखांपेक्षा जास्त रकमेची ठेव पावती असलेल्या नगर अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेच्या ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५०% इतकी रक्कम जुलै महिन्यात मिळणार असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली.

याबाबत डी आय सी जी सी यांचेकडे ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार कार्यालयाकडून सदरचे ना हरकत प्रमाणपत्र नुकतेच बँक प्रशासनास प्राप्त झाले आहे. त्यामुळे पाच लाखांपेक्षा जास्त ठेव रक्कम असलेल्या व विहित नमुन्यातील क्लेम फॉर्म व केवायसी अपडेट केलेल्या १९२६ ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५०% इतकी रक्कम जुलै महिन्यात मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ठेवी परत करण्याचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्याचे आरबीआयशी निगडित कामकाज जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण झाल्यानंतर या रकमा ठेवीदारांच्या खात्यात वर्ग करण्यात येणार आहेत अशी माहिती गणेश गायकवाड यांनी दिली.

## शासकीय वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया सुरू

नगर – संत गाडगे महाराज छात्रालय स्टेशन रोड अहिल्यानगर या शासनमान्य मागासवर्गीय वसतिगृहात सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शासनाच्या विहित टक्केवारीनुसार अनुसूचित जाती आणि जमाती, भटक्या जाती व विमुक्त जमाती तसेच आर्थिक मागास प्रवर्गातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व सर्व सोयीयुक्त निवासाची, नाष्टा व भोजनाची सुविधा उपलका करण्यात आली आहे. प्रवेश घेण्यासाठी संपर्क साधण्याचे आवाहन वस्तीगृहाचे अधीक्षक बाबासाहेब पातकळ ९७६७८०३०५५.

# अहिल्यानगरमध्ये खुल्या राज्यस्तरीय टॉपर्स स्पीड स्केटिंग स्पर्धेचे आयोजन

नगर – टिम टॉपर्स स्केटिंग अकॅडमीच्या वतीने सालाबाद प्रमाणे राज्यस्तरीय स्पीड



२५ व्या टॉपर्स खुल्या स्केटिंग स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा सकाळी ९:३० वा. सुरुवात होणार असून स्पर्धेत इनलाईन, रिक्रिएशन इनलाईन, क्वाड, टेनासिटी, स्केट प्रकार, तसेच मुले मुली वय वर्षे ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १४ व खुला गट होणार आहेत. विजेत्या खेळाडूंना सुवर्णपदक, रौप्यपदक, कांस्य पदकांनी सन्मानित करण्यात येणार आहेत. स्पर्धा कै. पुंडलिकराव भोसले स्केटिंग रींग, बुरुडगाव रोड येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या अधिक माहिती व नावनोंदणी करण्यासाठी आयोजक प्रशांत सर– ८०८७८७०८९९, प्रदिप सर – ८२७५१९१७७१.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार केलेला आहे. **सदर मिळकत हि विद्यमान मालक यांचे मालकीची असुन** त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातुन जाहिर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
दिनांक – २४/०६/२०२५

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील, **मौजे केडगांव** येथील खालील वर्णनाची मिळकत **सर्व्हे नं ४७६/४७८/४७९/४८६/४८७/४८९/४९७ मधील**

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ४४० | १६०.०० चौ.मी. | अॅमिनीटी | अॅमिनीटी | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ४४१ |
| ४४१ | १६०.०० चौ.मी. | अॅमिनीटी | प्लॉट नंबर ४४० | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ४४२ |
| ४४२ | १६०.०० चौ.मी. | अॅमिनीटी | प्लॉट नंबर ४४१ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ४४३ |
| ४४३ | १६०.०० चौ.मी. | अॅमिनीटी | प्लॉट नंबर ४४२ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ४४४ |
| ४४४ | २७२.५४ चौ.मी. | प्लॉट नंबर ४८४ | प्लॉट नंबर ४४३ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | १२.०० मी रुंदीचा रस्ता |
| ४८४ | १७५.२० चौ.मी. | प्लॉट नंबर ४८५ | अॅमिनीटी | प्लॉट नंबर ४४४ | १२.०० मी रुंदीचा रस्ता |
| ४८५ | १७५.२० चौ.मी. | अॅमिनीटी | अॅमिनीटी | प्लॉट नंबर ४८४ | १२.०० मी रुंदीचा रस्ता |

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक-**
**श्री विलास पोपटलाल कटारीया**
रा. साई नगर, बुरुडगांव रोड,
अहिल्यानगर (अहमदनगर).

**अॅड. प्रणव सुधीर धर्माधिकारी**
**अॅड. सौ. नुतन प्रणव धर्माधिकारी**
मो.नं.९०२८००८२००
पत्ता – भंडारी सावज अपार्टमेंट, कोठीरोड, अहिल्यानगर (अहमदनगर)


# ‘योग, पोषण आणि समग्र आरोग्य’ यावर आयएमएससीडीआरमध्ये राष्ट्रीय वेबिनार

नगर – बी.पी.एच.ई सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च (आय.एम.एस.सी.डी.आर.), अहिल्यानगर या संस्थेने ‘आंतरराष्ट्रीय योग दिना’ निमित्त समग्र समतोल – योग, पोषण आणि स्वास्थ्याचा समतोल साधण्याचा मार्ग या विषयावर राष्ट्रीय वेबिनार आयोजित केले. यामधून पारंपरिक योगविद्या आणि आधुनिक पोषणशास्त्राचा समन्वय साधत समग्र आरोग्याचा मूलमंत्र सहभागींपर्यंत पोहोचविण्यात आला. वेबिनारचे साधनतज्ज्ञ म्हणून क्लिनिकल व स्पोर्ट्स न्यूट्रिशनिस्ट, सर्टिफाईड पर्सनल ट्रेनर (सी.पी.टी) आणि योग वेलनेस प्रशिक्षक मालविका कुलकर्णी उपस्थित होत्या. समग्र पोषण, जीवनशैली व्यवस्थापन आणि अर्थविश्लेषण या क्षेत्रांतून आलेल्या त्यांच्या समृद्ध अनुभवाचा उपयोग करून त्यांनी सहभागींचे मार्गदर्शन केले.



मालविका कुलकर्णी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एन.इ.पी.) २०२० आणि ‘आंतरराष्ट्रीय योग दिन’ या विषयाच्या अनुरुप वेबिनारमध्ये सहा मूलभूत पैलूंचे महत्त्व समजावून सांगण्यात आले – सामाजिक, मानसिक–भावनिक, अध्यात्मिक, बौद्धिक आणि शारीरिक स्वास्थ्य. आयुर्वेदानुसार अन्नमय कोश, प्राणमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश आणि आनंदमय कोश या तत्वांचा सविस्तर ऊहापोह करण्यात आला. सात्त्विक, राजसिक आणि तामसी अन्नप्रकार, शरीरप्रकृतींचे वेगवेगळे गट (एंडोमॉर्फ, मेसोमॉर्फ, एक्टोमॉर्फ) आणि कार्बोहायड्रेट, प्रथिने, स्निग्धपदार्थ, मॅग्नेशियम, कॅल्शियम, ‘बी’ जीवनसत्त्वे आणि ‘सी’ जीवनसत्त्व यांच्या समतोल सेवनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तसेच डिजिटल फास्टिंगचे महत्त्व लक्षात घेऊन स्क्रीनसमोर घालविणाऱ्या वेळेचे योग्य नियोजन कसे करावे, हेही अधोरेखित करण्यात आले.समारोपाच्या सत्रात साधे खुर्चीवरील व्यायाम, शरीराचा ताण–तणाव कमी करण्यासाठीचे उपाय, ‘ओंकार’ व ‘मकार प्राणायाम’ अशा साधना प्रत्यक्ष करून दाखवल्या. सहभागींच्या शंका समाधानासाठी संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले. यातून व्यक्तिगत मार्गदर्शनाचा लाभ घेण्याची संधी मिळाली. समारोपास सहभागींचे प्रतिसाद होते. या वेबिनारमुळे सहभागींच्या दैनंदिन जीवनात समग्र समतोल साधून स्वास्थ्यपूर्ण, आनंददायी आणि समाधानकारक जगण्याचा मार्ग खुला झाला.

वेबिनारचे आयोजन डॉ. एम. बी. मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. समन्वयक म्हणून डॉ. स्वाती बार्नबस (ग्रंथपाल) आणि प्रा. अश्विनी थोरात (विद्यार्थीनी मंच समन्वयक आणि एम.बी.ए विभाग) यांनी सहकार्य केले. इतर सहकारी विद्यार्थीनी मंचाच्या प्राध्यापकांमध्ये प्रा. सुप्रिया सापा आणि प्रा. उत्कर्षा देठे यांनी योगदान दिले. याचे सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी शार्जिल इक्बाल (एम सी ए –२) यांनी केले. वेबिनारनंतर प्रतिक्रिया दिलेल्या सहभागींचे ई प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. समूहाच्या सहकार्याने योगाचा अवलंब करून शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यास चालना कशी देता येईल, याचा वेबिनारमधून सखोल उहापोह करण्यात आला.

या वेबिनारने सहभागींचे मनोबल वाढवलेच, शिवाय दैनंदिन जीवनात योग आणि समग्र आरोग्याच्या साधनेचा उपयोग कसा करता येईल, हे साध्या आणि प्रभावी पद्धतीने समजावून सांगण्यात आले.


## जाहीर नोटीसीस हरकत

सर्व लोकांस विशेष करुन दि.१०/०६/२०२५ रोजी दै. नवा मराठा या वर्तमानपत्रमध्ये अॅड. समीर वखारे यांचे मार्फत प्रसिध्दीस दिलेल्या जाहीर नोटीसीस या जाहीर नोटीसीस हरकतीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका अ.नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील सर्व्हे नं. २४५/ब/२ चे एकूण क्षेत्र ० हे ६३ आर (६३००.०० चौ.मी.) यासी चतु:सिमा : पुर्वेस – वडगांव रस्ता, दक्षिणेस– सर्व्हे नं. २४५ पैकी जमीन पश्चिमेस – नगर–मनमाड रोड, उत्तरेस– नाला/ओढा येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक शेतजमिन मिळकत व त्यामधील तदंगभुत वस्तु, वहिवाट, वागणूकीचे व इतर हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता असे.

वर कलममध्ये नमुद केलेली मिळकतीच्या खरेदी विक्री बाबत दै. नवा मराठा या वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस दि.१०/०६/२०२५ रोजी प्रसिध्दीस दिली आहे.

आमचे अशिल श्री. रमाकांत एन. सोनवणे, रा. स्टेशन रोड, अ.नगर यांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांना मिळकतीचे मालक अजीज डायाभाई व शाजीद डायाभाई यांनी वर नमुद मिळकतीचे जनरल मुखत्यार लिहून नोंदवून दिलेले आहे. आमचे अशिलाने दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रांवरुन दि.१०/०६/२०२५ रोजीचे वर नमुद जाहीर नोटीसीस हरकत घेण्यात येत आहे. दि.१०/०६/२०२५ रोजीचे नोटीसीमध्ये नमुद पारसमल मश्रीमल शाह रा. गांधीनगर, गुजरात यांनी बनावट दस्त तयार करुन मिळकतीच्या वर्णनामध्ये हेराफेरी करुन अजीज डायाभाई व शाजीद डायाभाई यांचे मिळकती फुकटात लाटण्यासाठी बेकायदेशीरपणे खरेदीखत नोंदवून घेतले. मात्र त्यामुळे त्यांना वर नमुद मिळकती संदर्भामध्ये कोणताही मालकी हक्क प्राप्त झालेला नाही. सदर पारसमल मश्रीमल शाह यांनी त्यांना कोणताही मिळकतीबाबत मालकी हक्क नसतांना महसूल दप्तरी दिशाभूल करुन स्वतःच्या नावाची नोंद करुन घेतली आहे व त्या आधारे मिळकत बेकायदेशीरपणे विक्री करण्याचे प्रयत्नात आहेत. त्याबाबत महसूल कोर्टात वाद प्रलंबित आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारे मालकी हक्क प्राप्त झालेले नाहीत. तसेच मिळकतीचा ताबा देखील त्यांचेकडे नाही. अशाप्रकारे सदरची मिळकत वादातील असल्याने सदर मिळकतीबाबत पारसमल मश्रीमल शाह रा. गांधीनगर, गुजराथ यांना कोणत्याही प्रकारे लिगल टायटल नसल्याने त्यांचे टायटल वादातील असल्याने त्यांचा कोणत्याही प्रकारे मालकी हक्क शाबीत होत नाही. केवळ मिळकतीचे ७/१२ रेकॉर्डला बेकायदेशीर रित्या फेरफार करुन पारसमल मश्रीमल शाह हे मालक असल्याचे भासवत आहेत व मिळकतीवर हक्क सांगत आहेत व मिळकत बेकायदेशीर रित्या विक्री करण्याचा प्रयत्न करत आहेत. सदर मिळकतीसंबंधी मे. कोर्टात व महसूल खात्याकडे वाद प्रलंबित आहेत. तसेच आमचे अशिलास वर नमुद मिळकतीबाबत कायदेशीर हक्क प्राप्त आहेत.

सबब सदर जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, पारसमल मश्रीमल शाह, रा गांधीनगर, गुजराथ यांचे बरोबर वर नमुद मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारे साठेखत, खरेदीखत, मुखत्यार, करार, हस्तांतर, लीज, इ.चा दस्त, व्यवहार करु नये. तसे केल्यास त्यास कोणताही कायदेशीर हक्क प्राप्त होणार नाही व निष्कारण कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागेल. तसेच खरेदी घेणार अगर व्यवहार करणारास कोणतेही कायदेशीर हक्क प्राप्त होणार नाहीत व ते आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहाणार नाहीत. कोणाचीही कोणतीही फसवणूक होऊ नये म्हणून मुद्दामहून सदरची सदर जाहीर नोटीसीस हरकत दिली आहे. कळावे, दि. २४/०६/२०२५.

पुप्पाल इस्टेट, २२५१
आडतेबाजार, अहिल्यानगर,
मो.नं. ८०८७०१६६४४

**अभिजीत चंद्रशेखर पुप्पाल**
अॅडव्होकेट



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर ठरलेला असुन त्यापोटी आमच्या अशिलाकडुन विद्यमान मालकाने विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व वहिवाटीची असुन सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २४/०६/२०२५.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, जिल्हा परिषद हद्दीतील मौजे बुरुडगांव येथील खालील वर्णनाची जिरायत शेतजमीन मिळकत –

**सर्व्हे नं. २९/ २ब चे एकुण क्षेत्र १हे. ६५ आर याचा आकार ४रु.०८ पैसे. यापैकी सदर सर्व्हे नंबरमधील दक्षिण बाजुची क्षेत्र ०हे. ८२.५० आर ही संपुर्ण शेतजमीन मिळकत.**

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – सर्व्हे नं. २८ | दक्षिणेस – सर्व्हे नं. ३०
पश्चिमेस – रस्ता | उत्तरेस – सर्व्हे नं. २९/२ब पैकी गीतेश्वर चिमाजी शिंदे यांची जमिन

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक** -
१. **लंकाबाई धोंडीराम शिंदे,** रा. वडाळा बहिरोबा, टॉवर जवळ, ता. जि. अहिल्यानगर.
२. **भास्कर धोंडीराम शिंदे,** रा. मोहिनी नगर, दत्त मंदिर जवळ, केडगांव, अहिल्यानगर.
३. **संपत धोंडीराम शिंदे,** रा. वडाळा बहिरोबा, टॉवर जवळ, ता. जि. अहिल्यानगर.
४. **भारती भिमराज वाळके,** रा. मोहिनी नगर, दत्त मंदिर जवळ, केडगांव, अहिल्यानगर.
५. **अर्चना संतोष शेळके,** रा. गावठाण, तांदळी दुमाला, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर.

**अॅड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं. ५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा विक्री व्यवहार आमचे अशिलांबरोबर होणार आहे, सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित आहे असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २४/०६/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, तालुका नगरपैकी पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका हद्दीतील, मौजे भिंगार** येथील खालील वर्णनाची मिळकत –

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ३५१/१ | १६ | २०१.०० चौ. मी. |

(बांधकाम नकाश्याप्रमाणे प्लॉट नंबर १६ चे क्षेत्र २७९.०० चौ.मी.)

हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील असलेले ग्राऊंड फ्लोअरचे बांधकाम क्षेत्र ९५.६९ चौ. मी. व फर्स्ट फ्लोअर चे बांधकाम क्षेत्र ७७.१८ चौ.मी., असे एकुण बांधकाम क्षेत्र १७२.८७ चौ.मी. लाईट मीटर, नळ कनेक्शनसह ही आहे त्या स्थितीत संपूर्ण मिळकत.

**यांसी चतु:सीमा** -
पुर्वेस – प्लॉट नंबर १५ | दक्षिणेस – लागु मिळकत
पश्चिमेस – प्लॉट नंबर १७ | उत्तरेस – रस्ता

**विद्यमान मालकांचे नाव-**
**श्री. कृष्णा श्रीराम जग्गी (उताऱ्याप्रमाणे)**
**श्री. किशन श्रीराम जग्गी (ओळखपत्राप्रमाणे)**
रा. गोविंदपुरा गुरुद्वारा, सर्व्हे नंबर ३५०,
प्लॉट नंबर १६, गोविंदपुरा, आहिल्यानगर.

**अॅड.आर.टी.शर्मा**
**अॅड. गणेश एम. शर्मा**
मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स,
दाळमंडई, अहिल्यानगर


# आठरे पाटील पब्लिक स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



नगर – सावेडी भागातील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन सकाळच्या प्रसन्न वातावरणात संपन्न झाला. यावेळी शाळेच्या प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनींनी व शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

शाळेच्या शिक्षिका सौ. विद्या पवार व कु. श्रृतिका ढाकणे यांनी विद्यार्थ्यांना योगासनाचे प्रात्यक्षिके करुन योगासनाचे धडे दिले व योगदिनाविषयी मार्गदर्शन केले. योगासनांनी मनाचे सामर्थ्य वाढते. शरीरसंपत्ती ही धनसंपत्तीपेक्षाही श्रेष्ठ आहे. कारण धनसंपत्ती आपल्याला पुन्हा पुन्हा संपादन करता येते, पण शारीरिक संपदा जर ढासळली तर परत मिळणे फार कठीण आहे. म्हणून सर्वांना दररोज व्यायाम करण्याचा सल्ला दिला. तसेच आपल्याला सुदृढ शरीर व निरामय आरोग्यासाठी नियमित योगासने करण्याची गरज आहे. निरोगी व तणावमुक्त राहण्यासाठी, समृध्दी व शांतता आणण्यासाठी रोज एक तास योगासनासाठी देणे आवश्यक आहे, असे शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले.

या अकराव्या आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त चंद्रभान आठरे पाटील ग्राम नवोदय ट्रस्टचे अध्यक्षा डॉ. अंजली आठरे पाटील, कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील व सर्व विश्वस्त यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले. यावेळी मुख्याध्यापक, प्राथमिकच्या विभागप्रमुख, पर्यवेक्षिका, समन्वयक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# श्री शाहू विद्या मंदिर येथे जागतिक योग दिन उत्साहात



नगर–अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री शाहू विद्या मंदिर खडांबे ता.राहूरी येथे जागतिक योग दिन झाला. या कार्यक्रमास योग विद्याधाम, अहिल्यानगर येथील श्री समर्थ इंडस्ट्रीजचे संचालक प्रविण उरणकर, स्नायडर इलेक्ट्रिकमधील अविनाश कुलट, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ नगर येथील संगीता भालसिंग, नगर अर्बन बँकेतील ज्युनियर ऑफिसर माधुरी आडेप या शिक्षकांनी विद्यालयात विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे दिले. यामध्ये ताडासन, भुजंगासन, वज्रासन, वृक्षासन, पवनमुक्तासन, मकरासन, धनुरासन, पद्मासन, मयुरासन, त्रिकोणासन, शशांकासन, सर्वांगासन, शवासन, भ्रामरी प्राणायाम, अनुलोम – विलोम आदि योगा आसने कसे करावेत हे समजावून सांगीतले व स्वतः सुद्धा ही आसने करुन दाखविली.

योग प्रशिक्षकांचा सन्मान मुख्याध्यापक मकरंद रायते यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी आरोग्य प्रशिक्षक प्रकाश धोंडे, विद्यालयाचे मुख्याध्यापक मकरंद रायते, पर्यवेक्षक आप्पासाहेब शिंदे, आर. एस.पी. शिक्षक राहूल जाधव, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका शिक्षकेतर सेवकवृंद आदि उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टांत नमूद केलेली **मौजे खंडाळा, ता. जि. अहिल्यानगर** हद्दीतील बांधकामासह बिगरशेती मिळकतीचे विद्यमान मालक **संतोष भानुदास पोटघन,** रा. खंडाळा, ता. जि. अहिल्यानगर यांचे मालकी व वहिवाटीची असून ती त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे असा भरोसा दिलेला आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाने आमचे अशिलांस खरेदी देणेची बोलणी करून विसार म्हणून आमचे अशिलांकडून रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजखमी आहे अशी खात्री व भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरीही सदर मिळकतीबाबात कोणाचेही खरेदी, साठेखत, गहान, दान, बक्षीसपत्र कर्जे, बोजा, लिज, लिन वारसाहक्क, कोर्टमनाई हुकूम अव्वल जप्ती, कोर्ट कार्यवाही अगर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून **७ (सात)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्या सह खालील पत्यावर समक्ष आणुन द्यावी व पोहच घ्यावी मुदतीत कोणतीही काही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असे समजून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करतील तदनंतर कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकत** - डि.।। अहिल्यानगर सब डि.।। ता. अहिल्यानगर पैकी **मौजे खंडाळा** येथील बांधकामासह बिनशेती मिळकत खालील वर्णनाची–

| गट नंबर | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| १७७/१/२ | १०.००.०० आर.चौ.मी. | ५०.०० रु.पै. |

**यांसी चतु:सिमाः** पुर्व– नगर–दौंड रस्ता, दक्षिण– ग.नं. १७७ पैकी, पश्चिम– ग.नं. १७८, उत्तर– ग.नं. १७७ पैकी

येणेप्रमाणे चतु:सिमा पूर्वक मिळकत वागणूकीच्या, वहिवाटीच्या हक्कासहीत वगैरे तदंगभूत वस्तूसह काही एक राखून न ठेवता.
दिनांक : २४/०६/२०२५
अहमदनगर.

**अॅड. सुभाष विठ्ठलराव धामणे**
बी.एस.सी., एल.एल.बी.
८, गणराज अपार्टमेंट, कोर्ट गल्ली, अहमदनगर.
मो.नं. ९४२२२२११२३



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर ठरलेला असुन त्यापोटी आमच्या अशिलाकडुन विद्यमान मालकाने विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व वहिवाटीची असुन सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २४/०६/२०२५.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे निमगांव वाघा येथील** खालील वर्णनाची जिरायत शेतजमीन मिळकत –

**गट नं. ५०२/१/१ चे एकुण क्षेत्र १हे. ६० आर याचा आकार ३रु. ८० पैसे. ही संपुर्ण शेतजमीन मिळकत.**

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – गट नं.५१० | दक्षिणेस – गट नं.५०३ व ५०५
पश्चिमेस – रस्ता | उत्तरेस – गट नं. ५०२ पैकी

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक** -
**संजय भुरालाल डागलिया,**
रा. फ्लॅट नं.८, वृंदावन अपार्टमेंट,
श्रीधर नगर, एलप्रो कंपनी मागे,
चिंचवड, पुणे.

**अॅड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं. ५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

# टॉमेटो गार्लिक पास्ता



झटपट रेसिपी

दोस्तांनो, पावसाळ्यात गरमागरम पण वेगळं काही खावंसं वाटतं. अशावेळी मस्तपैकी टॉमेटो गार्लिक पास्ता बनवता येईल.

**सामग्री:** ४०० ग्रॅम स्पॅगेटी पास्ता, दोन चमचे पार्मिसन चीझ, एक टी स्पून काळीमिरी, अर्धा किलो चेरी टोमॅटो, अर्धा टेबलस्पून लसूण, ६ ते ७ तुळशीची पानं किंवा बासिल हर्ब, एक टी स्पून सोया सॉस, एक टेबलस्पून टॉमेटो सॉस, एक टीस्पून ग्रीन चिली सॉस, मीठ, तेल आणि सजावटीसाठी कोथिंबिर

**कृती:** एका भांड्यात पाणी उकळायला ठेवा. त्यात थोडं मीठ घाला. पाणी उकळल्यानंतर त्यात स्पॅगेटी पास्ता घालून शिजवून घ्या. पाणी गाळून पास्ता गार करायला ठेवा. एका कढईत दोन टेबलस्पून तेल गरम करा. त्यात लसूण आणि टॉमेटो घालून शिजवून घ्या. टॉमेटो मऊ शिजल्यानंतर त्यात मिरपूड,मीठ, ग्रीन चिली सॉस, सोया सॉस घालून परतून घ्या. मसाला तयार झाल्यानंतर त्यात पास्ता घाला. यात टॉमेटो सॉस, बासिल किंवा तुळशीची पानं, चीझ आणि कोथिंबिर घालून पाच ते आठ मिनिटं शिजवून घ्या. तुमचा पास्ता तयार आहे. गरमागरम खा.




# लॉकर ठरले यशाची गुरुकिल्ली

अचिव्हर

सनत जैन आणि विशाल जैन हे दोघे मेहुणे आहेत. दोघेही पूर्वी दिल्लीतील चांदणी चौकात सीसीटीव्हीचे दुकान चालवत होते. परंतु या क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेमुळे त्यांना हे दुकान बंद करावे लागले. त्यानंतर दोघांनी 'लवना स्मार्ट डोअर लॉक्स' नावाचा एक नवीन ब्रँड सुरू केला. ते डिजिटल लॉकर बनवतात. आज हा ब्रँड कोट्यवधी रुपयांचा बनला आहे.

सनत जैन आणि विशाल जैन यांनी बाजारपेठेतील वाढत्या स्पर्धेमुळे चांदणी चौकातील सीसीटीव्हीचे दुकान २०२० मध्ये बंद केले. या काळात ते चीनला गेले आणि दोघांनाही डिजिटल स्मार्ट लॉकर व्यवसाय सुरू करण्याची कल्पना सुचली. डिजिटल स्मार्ट लॉकरने प्रभावित होऊन त्यांनी प्रथम ते त्यांच्या घरात बसवले आणि त्याचा अनुभव घेतला. अशा प्रकारे त्यांनी 'डिजिटल स्मार्ट लॉकर'चा व्यवसाय सुरू केला. दोघांनीही हे क्षेत्र समजून घेण्यासाठी बाजारात जाऊन खूप



अभ्यास केला. विविध ब्रँडसाठी स्मार्ट लॉक बनवणारे ओईएम (मूळ उपकरण उत्पादक) म्हणून काम करण्यास सुरुवात केली.


दोघांनीही २०२१ मध्ये लवना स्मार्ट डोअर लॉक्स नावाचा स्वतःचा ब्रँड सुरू केला आणि या व्यवसायात प्रत्येकी ५० लाख रुपये गुंतवले. त्यांच्या मूळ कंपनीचे नाव भगवान श्री लॉक्स प्रायव्हेट लिमिटेड असे आहे. विशाल जैन यांनी खरेदी आणि सर्व्हिसिंग पाहिले तर सनत जैन यांनी विक्री आणि मार्केटिंगकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. परंतु हळूहळू लोकांचा त्यांच्या उत्पादनांवर विश्वास बसला आणि त्यांचा व्यवसाय वाढला.

**डिजिटल लॉकर्समध्ये प्रगत तंत्रज्ञान**

त्यांच्या डिजिटल स्मार्ट लॉकर्समध्ये प्रगत तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. त्यात वाय-फाय आणि ब्लूटूथ, ०.४ सेकंदात फिंगरप्रिंट डिटेक्शन, ओटीपी सारखी वैशिष्ट्ये आहेत. आज भारतातील १२० स्टोअरमध्ये लवना स्मार्ट डोअर लॉक्सची विविध उत्पादने उपलब्ध आहेत. लवना स्मार्ट डोअर लॉक्सची उत्पादने ऑनलाइनदेखील विकली जातात. फक्त तीन वर्षात या कंपनीची उलाढाल सात कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

## टेक टॉक

### एआय चॅटबॉट्सही धोकादायक




नवीन एआय चॅटबॉट्स आणि लेखन साधनांचा व्यापक वापर कंपन्यांना डेटा लीकचे बळी बनवू शकतो. हॅकर्स संवेदनशील कॉर्पोरेट तपशीलांमध्ये प्रवेश करण्यासाठी किंवा कंपनीविरुद्ध कारवाई करण्यासाठी चॅटबॉट्सना लक्ष्य करू शकतात, अशी भीती आहे. चॅटबॉट्समध्ये असलेली गोपनीय माहिती आता भविष्यात एआय कंपन्या चॅटबॉट्सना प्रशिक्षण देण्यासाठी वापरतील, अशीही चिंता आहे. अशा परिस्थितीत डेटा सुरक्षिततेची कोणतीही हमी नाही. 'मायक्रोसॉफ्ट कॉर्प आणि अल्फाबेट इंकसह प्रमुख टेक कंपन्या चॅटबॉट्स आणि सर्च इंजिन अधिक अद्ययावत करण्यासाठी 'जनरेटिव्ह एआय'चा वापर करत आहेत. यासाठी, ते इंटरनेटवर विचारल्या जाणाऱ्या प्रश्नां चा वापर करत आहेत. अशा परिस्थितीत चॅटबॉट्सना विचारलेले प्रश्नकदेखील संग्रहित केले जात आहेत आणि त्यातून 'एआय'ला प्रशिक्षण दिले जात आहे, असे गृहीत धरले जाऊ शकते. या साधनांमध्ये गोपनीय किंवा वैयक्तिक डेटा भरला जात असेल तर डेटा हटवणे खूप कठीण असू शकते, असे अहवालात म्हटले आहे.

## ॲप वर्ल्ड

### आता 'एआय' करेल व्हिडीओ एडिटिंग

व्हिडिओ बनवणाऱ्यांसाठी 'मेटा एआय'ने एक उपयुक्त फिचर आणले आहे. व्हिडिओ बनवून एडिटिंगची गुंतागुंत नको असणाऱ्यांचे काम आता सोपे



झाले आहे. आता फक्त व्हिडीओ अपलोड केला तरी नंतर 'मेटा एआय'च्या मदतीने ५० पेक्षा जास्त प्रॉम्प्टस वापरून त्यात हवे ते बदल करता येतात. या फीचरचा वापर करून आपण व्हिडिओतल्या व्यक्तींचे कपडे, पार्श्वभूमी, शैली आणि अगदी वातावरणदेखील बदलू शकतो. हे फिचर 'मेटा एआय ॲतप' आणि वेबसाइटवर अगदी सहजपणे कार्य करते. युजरला फक्त त्याचा व्हिडीओ अपलोड करायचा आणि त्यात काय बदलायचे आहे, ते ठरवायचे आहे. म्हणजे तुम्हाला टी-शर्ट इतर रंगाचा हवा असेल किंवा पार्श्वआभूमीत समुद्राऐवजी पर्वत दिसावेत, असे वाटत असेल तर फक्त संबंधित प्रॉम्प्ट निवडा आणि एआय काही सेकंदात तो बदल करेल.

## नवे काही

### कुलरमधून घ्या एसीची हवा!

कुलरमध्ये बर्फासोबत दोन ते तीन चमचे मीठ टाकल्यावर कुलर एसीपेक्षाही थंड हवा देते. तसेच याचा वीजबिलावर कोणताही परिणाम होत नाही. बर्फ आणि मिठाचे मिश्रण कूलरमध्ये टाकल्यानंतर थोड्याच वेळातच पूर्वीपेक्षा अधिक थंड हवा येत असल्याची जाणीव होईल. जवळपास एसीमधून येते तेवढीच थंड हवा कुलरमधून येईल. अनेक जण या ट्रीकवर संशय व्यक्त करतात. मात्र



ही ट्रीक काम करते. यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे, तुम्ही बर्फामध्ये मीठ टाकता तेव्हा तो बर्फ अधिक वेगाने वितळू लागतो. बर्फ वितळल्यामुळे कुलरमधून एसी इतकी थंडी हवा मिळते. मात्र हा प्रयोग करताना केवळ दोन ते तीन चमचे एवढेच मीठ टाकावे. त्यापेक्षा अधिक टाकल्यास मीठाच्या पाण्यामुळे कुलरमधील काही इलेक्ट्रिकल पार्ट्स खराब होण्याची शक्यता असते. काही लोखंडांच्या पार्ट्सवर यामुळे गंज चढतो.


# केसाचा लूक बदलण्याची योग्य वेळ

ग्रुमिंग

पुरुषांच्या लूकमध्ये केसांची मोठी भूमिका असते. पण बर्याचि पुरुषांना हेअरस्टाईलबद्दल योग्य माहिती नसते. त्यामुळे त्यांचा लूकही खराब होतो. लग्न-समारंभाच्या किती दिवस आधी केस कापणे योग्य आहे, याचाही कोणी फारसा विचार करत नाही. सहसा मुले सलूनमध्ये जातात आणि लग्नाच्या एक-दोन दिवस आधी केस कापतात. तुम्हीही अशी चूक करणार असाल तर थांबा.

सर्वप्रथम एखाद्या समारंभाला जाण्यापूर्वी किती दिवस आधी केस कापले पाहिजेत हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. जेणेकरून समारंभाच्या मुख्य दिवशी तुमची हेअरस्टाईल योग्य दिसेल आणि तुमचा लूकही अपेक्षेप्रमाणे दिसेल. लग्न किंवा साखरपुड्यासारख्या खास समारंभाच्या आधी पुरुषांनी निश्चितच केस कापले पाहिजेत. पुरुषांचे केस लवकर वाढतात आणि त्यांना योग्य आकारात ठेवणे महत्त्वाचे आहे. परंतु समारंभाच्या फक्त एक-दोन दिवस आधी केस कापल्याने संपूर्ण चेहर्यावचा लूक खराब होऊ शकतो.

५-६ दिवस आधी केस कापा




पुरुषांना एखाद्या विशेष समारंभाला किंवा स्वतःच्या लग्नाला उपस्थित राहायचे असते तेव्हा त्यांनी केसांचा उत्तम लूक येण्यासाठी सुमारे ५ ते ६ दिवस आधी केस कापून घ्यावेत. केस कापल्यानंतर, योग्य आकारात येण्यासाठी थोडा वेळ लागतो. त्यामुळे समारंभाच्या दिवशी हेअर स्टाईल परिपूर्ण दिसते. तसेच, इतके दिवस आधी केस कापण्याल्यामुळे केस कापताना झालेल्या चुकादेखील दुरुस्त करता येतात.

# अक्षम्य चूक झाली!

मॅच मेकिंग

प्रेयसीसोबतचं तीन वर्षांचं नातं संपवून मी दुसऱ्याच मुलीकडे आकर्षित झालो. नातं संपवताना माझी प्रेयसी खूप रडली. पण काही काळानंतर तिने हा निर्णय स्वीकारला. मी शिक्षणानिमित्त दुसऱ्या शहरात गेल्यानंतर नवं नातं जोडलं. पण फक्त दहा महिन्यातच हे नातं संपलं. कॉलेज संपल्यानंतर ती मुलगीही मला सोडून गेली. आधीच्या प्रेयसीसोबतचं नातं संपवून मी खूप मोठी चूक केली आहे. ती आता आयुष्यात पुढे निघून गेली आहे. माझ्याशी बोलण्यात तिला रस नाही. मी काय करू?

**उत्तर :** सर्वात आधी तू समुपदेशकांना भेट. तुला नात्यामधून नेमकं काय हवं आहे, हे जाणून घे. याबाबतची स्पष्टता तुझ्याकडे असायला हवी. सद्यपरिस्थितीत तू स्वत:ला वेळ दे. काही काळ कोणत्याही



नात्यात अडकू नकोस. स्वयंविकासावर भर दे. तुझी प्रेयसी आयुष्यात पुढे निघून गेली आहे. त्याचप्रमाणे तूही भविष्याचा विचार कर. आता भूतकाळ बदलता येणार नाही. पण भविष्य आपल्या हातात आहे. उज्ज्वल भवितव्यासाठी आपण नक्कीच प्रयत्न करू शकतो.

# इथे चुकू नका

फॅशन पॅशन

आपण फॅशनच्या बाबतीत काही चुका करत असतो. चुका करायला हरकत नाही पण त्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. अर्थात अजाणतेपणीही काही चुका होतात. त्या टाळल्या तर आपण नक्कीच स्मार्ट दिसू शकतो.



* दोस्तांनो, पँटचे खिसे वस्तू ठेवण्यासाठी असले तरी ते फुगता कामा नयेत. पँटच्या शिखातून बाहेर येणार्या चाव्या, वॉलेट फार वाईट दिसतात. वॉलेट उगाचच खिशात कोंबू नका. बॅकपॅकच्या कप्प्यात टाका. कार्ड ठेवण्यासाठी लेदरच्या कार्ड होल्डरचा वापर करा.

* फार लांब ट्राउझर्स घालू नका. यामुळे तुमच्या लूकचा पार विचका होईल. पँट पायात येणार नाही याची काळजी घ्या.

* 'स्क्वेअर टो ड्रेस' हा बुटांचा प्रकार आता बराच मागे पडला आहे. हे बूट आउट ऑफ फॅशन आहेत. त्यामुळे ते कॅरी करू नका. त्याऐवजी पुढच्या बाजूने गोलाकार असणारे शूज घ्या.


* एकाच वेळी जास्त ॲक्सेसरीज घालून नका. त्याऐवजी छानसं घड्याळ, पॉकेट स्वेअर, ट्रेंडी टाय, कफलिंक्स यापैकी काहीतरी ट्राय करा.

* मोज्यांची निवड योग्य असायला हवी. ट्राउझरला साजेसे न्यूट्रल रंगाचे मोजे घ्या. बुटांना शोभणारे भडक रंगाचे मोजे अजिबात घेऊ नका. कॉन्ट्रास्ट सॉक्सही चालून जातील. पण असे सॉक्स कॅज्युअल ऑकेजनसाठी ठेवा.

* खोल व्ही नेक असणारा टी शर्ट अजिबात घालू नका. असे टी शर्ट चांगले दिसत नाहीत. त्याऐवजी हेन्ले स्टाईल टी शर्टस ट्राय करा.

# जिने चढा, फिट रहा

फिटनेस फंडा



फिटनेस राखण्यासाठी, वजन कमी करण्यासाठी आपण बरंच काही करतो. ट्रेडमीलसारखी महागडी उपकरणं विकत घेतो. जीमच्या मेंबरशीपसाठी बरेच पैसे खर्च करतो. पण तुम्ही स्वस्तात फिट राहू शकता. यासाठी हवी समर्पित वृत्ती, जिद्द आणि जिने. तुमच्या इमारतीला भरपूर जिने असतील तर कॅलरी जाळण्यासाठी तुम्हाला दुसरीकडे कुठेही जावं लागणार नाही. जिन्यावरून धावणं हा एक उत्तम व्यायाम ठरू शकतो. फक्त अर्धा तास जिन्यावरून धावल्याने ५०० कॅलरी खर्च होतात, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. त्यामुळे तुम्ही जिन्यांवरून धावण्याचा व्यायाम सुरू करू शकता. याबाबतच्या काही टिप्स...

* इतर कोणत्याही व्यायाम प्रकाराप्रमाणे जिन्यावरून धावण्याचा व्यायाम सुरू करण्याआधी 'वॉर्म अप' म्हणजे पूर्वतयारी करणं गरजेचं आहे. धावणं सुरू करण्याआधी ३ ते ४ मिनिटं जिन्यांवरून चढउतार करा. हळूहळू वेग वाढवा.

* जिन्यांवर तुम्ही पुश-अपही करू शकता. नेहमीच्या पुश-अप्सप्रमाणेच हा व्यायाम करायचा आहे. खालच्या पायरीवर उभे रहा. हात तिसऱ्या किंवा चौथ्या पायरीवर ठेवा आणि पुशअप्स करा.

* व्यायाम करायला फार वेळ नसला तरी काळजी करू नका. पाच मिनिटं जिन्यांवरून चढउतार करा. मग वेग वाढवा. त्यानंतर पुढची पाच मिनिटं जिन्यांवरून जोरात धावा. फक्त दहा मिनिटांत तुमचा व्यायाम होईल.

* तुमच्याकडे २० मिनिटं असतील तर एक पायरी सोडून जिने चढण्याचा व्यायाम करा. सुरुवातीला वेग कमी ठेवा. मग दोन पायर्यार सोडून जिने चढण्याचा प्रयत्न करा.

# 'न्यूक्लिअर इंजिनीअरींग'चा आकर्षक पर्याय

करियर वाटा

आजच्या युगात ऊर्जा ही सर्वात मोठी गरज बनली आहे. वाढत्या मागणीमुळे पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि टिकाऊ ऊर्जा स्रोतांची आवश्यकता अधिक तीव्र झाली आहे. अशा परिस्थितीत 'न्यूक्लियर इंजिनीअरींग' ही शाखा करिअरसाठी एक महत्त्वपूर्ण आणि आकर्षक पर्याय ठरते. ही शाखा केवळ वीज निर्मितीपुरती मर्यादित नसून वैद्यकीय क्षेत्र, संशोधन, संरक्षण आणि औद्योगिक विकासातही मोठ्या प्रमाणात योगदान देते.

**न्यूक्लियर इंजिनिअरिंग म्हणजे काय?**

'न्यूक्लियर इंजिनीअरींग' या विज्ञानशाखेत अणुऊर्जेचा वापर करून वीज निर्मिती, रेडिएशन नियंत्रण, अणुउर्जा रिएक्टरचे डिझाइन, आणि कचरा व्यवस्थापन (वेस्ट मॅनेजमेन्ट) यासारखी कामे केली जातात. यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित यांचा समावेश असतो.

**न्यूक्लियर इंजिनिअरिंगमध्ये हे कोर्सेस उपलब्ध आहेत.**


*बी. टेक-चार वर्षांचा

*एम. टेक/एम. एस.-एक ते दोन वर्षांचा

* पीएच. डी- संशोधनासाठी तीन ते पाच वर्षांचा कोर्स

भारतामध्ये प्रवेशासाठी जेईई, गेट, किंवा सीयूईटी परीक्षांमधून पात्रता मिळवावी लागते. बारावीत पीसीएम (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित) असणे आवश्यक आहे.

**अभ्यासक'मासाठी प्रमुख शैक्षणिक संस्था**



**भारतात :**

*आयआयटी - रिएक्टर फिजिक्समध्ये विशेष अभ्यासक'म

* जादवपूर विद्यापीठ -एम. टेक. साठी उत्कृष्ट पर्याय

* भाभा ॲवटॉमिक रिसर्च सेंटर - संशोधन व प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध

*पंडित दीनदयाळ ऊर्जा विद्यापीठ - खासगी क्षेत्रात आघाडीवर

**परदेशात:**

*एमआयटी(अमेरिका) - रिएक्टर डिझाइनसाठी जागतिक मान्यता

*यूसी बर्कली (अमेरिका)- न्यूक्लियर फ्युजन संशोधन

*इम्पिरिअल कॉलेज, लंडन (ब्रि'टन) - डीकमिशनिंग आणि सेफ्टी कोर्सेस

*मॅकमॉस्टर विद्यापीठ (कॅनडा) - मेडिकल ॲप्लिकेशन्सवर भर

*केआयटी (जर्मनी) - वेस्ट मॅनेजमेंटसाठी प्रसिद्ध

भारतात केवळ मोजक्याच संस्था न्यूक्लियर इंजिनिअरिंग कोर्सेस देतात. त्यामुळे प्रवेशासाठी मोठी स्पर्धा असते. परदेशात प्रवेशासाठी जीआरई, टोफेल, किंवा इलेट्स स्कोअर लागतो. परदेशातील वार्षिक फी सुमारे २०-५० लाखादरम्यान असते, तर भारतात ती दोन ते आठ लाखांदरम्यान असते.

**पगार आणि करिअर संधी**

'न्यूक्लियर इंजिनीअरींगच्या क्षेत्रात नोकरी मिळाल्यावर भारतात चार ते सहा लाख रुपये इतका वार्षिक पगार मिळतो. अनुभव वाढल्यावर तो १०-१५ लाखांपर्यंत जातो. अमेरिकेत सरासरी पगार १.०५ ते १.६० लाख डॉलर (८५ लाख ते १.३ कोटी) पर्यंत असतो. ब्रिटनमध्ये मिड-लेव्हल इंजिनीअर्सना ३५ ते पन्नास हजार पौंड (३७ ते ५३ लाख) पगार मिळतो.

**मुख्य करिअर पर्याय :**

*न्यूक्लिअर इंजिनीअर- पॉवर प्लँट्समध्ये रिएक्टर डिझाइन आणि ऑपरेशन

*सेफ्टी इंजिनीअर- रेडिएशन नियंत्रण आणि पर्यावरण सुरक्षा

*रिसर्च सायंटिस्ट - न्यूक्लियर फ्युजन/वेस्ट मॅनेजमेंट

*मेडिकल फिजीस्ट - रेडिएशन थेरपी उपकरणांचे डेव्हलपमेंट

*प्रोजेक्ट इंजिनीअर - न्यूक्लियर प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणी.

# लोणावळ्यात काय पाहाल?

भटकंती

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीतून थोडा वेळ स्वत:साठी काढणे खूप महत्त्वाचे असते. त्यामुळे निश्चियतच आपल्या डोक्यावरील ताण कमी करण्यास मदत होते. तसेच बाहेर फिरायला गेल्याने आपण ताजे तवाने होऊन पुन्हा जोमाने कामाला लागू शकतो. त्यामुळे लोक अनेकदा शनिवार-रविवारी फिरायला जाण्यासाठी बाहेर पडतात. असेच एक ठिकाण म्हणजे लोणावळा.

लोणावळा मुंबईपासून १२० किलोमीटर तर पुण्यापासून साठ किलोमीटर अंतरावर आहे. पार्टी करण्यापासून निसर्गाचा आनंद घेण्यापर्यंत सर्व गोष्टींसाठी हे ठिकाण परिपूर्ण आहे. लोणावळ्याला फिरायला जाण्यासाठी सकाळी लवकर निघा. इथे पोहोचून नाश्ता केल्यानंतर तुम्ही काही वेळ विश्रांती घेऊ शकता. यानंतर, साइटसीइंगला सुरुवात करा. इथे तुम्हाला भुशी धरण पाहायला मिळेल. ते पावसाळ्यात खूप सुंदर दिसते. याशिवाय, तुम्ही सनसेट पॉइंट/ टायगर पॉइंट, लायन पॉइंटवरून अद्भुत दृश्याचा आनंद घेऊ शकता.

लोणावळ्यात दुपारपर्यंत फिरल्यानंतर तुम्ही कोणत्याही प्रसिद्ध



रेस्टॉरंट किंवा कॅफेमध्ये दुपारचे जेवण करू शकता. तुम्हाला हवे असल्यास कोणत्याही फार्महाऊस किंवा रिसॉर्टमध्ये बुफे लंचदेखील बुक करू शकता. किंवा तुम्ही स्ट्रीट फूडचा आनंद घेऊ शकता. दुपारी पुन्हा फिरायला जा. या वेळी तुम्ही लोणावळा तलाव, विसापूर किल्ला नक्की पाहा. लोणावळ्याला वॅक्स संग्रहालय आहे. ते मुलांना नक्कीच आवडेल. खरेदी करायची असेल तर तुम्ही स्थानिक चिक्की मार्केटमध्ये तेथील स्पेशल चिक्की व इतर खरेदी करू शकता.

**संध्याकाळी हिल व्ह्यू पॉइंटचा आनंद घ्या**

संध्याकाळी कोणत्याही हिल व्ह्यू पॉइंटवर चहा आणि भज्यांचा आस्वाद घ्या. हवामान चांगले असेल तर तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या स्टॉलवर थांबून खाऊ-पिऊ शकता. गर्दी आणि रहदारी टाळण्यासाठी सकाळी लवकर निघणे महत्त्वाचे आहे.



कल्याण रोड, अनुसयानगर परिसरातील रस्त्याची पाहणी करताना ॲड. युवराज शिंदे. (छाया – लहू दळवी)

## रस्ता खोदून ठेवल्यामुळे वाहतुकीचा प्रश्न झाला निर्माण

### काम तातडीने मार्गी लावा अन्यथा महानगरपालिका आयुक्त दालनात आंदोलन

नगर – कल्याण रोड, अनुसयानगर, महालक्ष्मी लॉन जवळील रस्ता ठेकेदाराने काम करण्यासाठी गेल्या २ महिन्यापूर्वी खोदून ठेवला, त्यानंतर रस्त्याचे काम बंद झाले.

हा रस्ता अनुसयानगर, विद्या कॉलनी, आनंद पार्क या परिसराला जोडणारा मुख्य रस्ता आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांचा दळणवळणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तर नागरिकांना खूप लांबून विळखा घालून जावे लागते, ठेकेदाराचे मनमानी पद्धतीने काम सुरू आहे. या कामाचा दर्जा देखील निकृष्ट आहे, महापालिका प्रशासनाचे देखील याकडे अक्षरश: दुर्लक्ष असल्यामुळे ठेकेदाराने काम बंद केले आहे. खोदलेल्या रस्त्यामुळे नागरिकांना वाहतुकीसाठी अडचण निर्माण होत असून दररोज या ठिकाणी छोटे–मोठे अपघात देखील होत आहे. तरी महापालिकेने २ दिवसात रस्त्याचे काम सुरू न केल्यास आयुक्त यांच्या दालनात तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे ॲड. युवराज शिंदे यांनी दिला आहे.

कल्याण रोड, अनुसयानगर परिसरातील ठेकेदाराने खोदून ठेवलेल्या रस्त्याची पाहणी करताना ॲड. युवराज शिंदे, अरुण ढाकणे, गणेश अमराळे, राजेंद्र पाडाळे, विराज ताक, सुधाकर बोल्ली, रवी मैड, गणेश बेरड, शेषराव आगळे, विवेक खोले, संकेत डोके आदी उपस्थित होते.

# मोकाट जनावरांचा बंदोबस्त कधी करणार....?





अहिल्यानगर येथील भिंगार उपनगर येथे मोकाट जनावरांची झुंज लागल्याने व्यावसायिकांचे नुकसान झाले.

नगर – अहिल्यानगर येथील भिंगार उपनगर येथे मोकाट जनावरांची झुंज लागल्याने व्यावसायिकांचे नुकसान झाले. सुमारे तासभर ही झुंज सुरूच होती. त्यामुळे व्यावसायिक व नागरिकात भीतीचे वातावरण पसरले होते. गेल्या अनेक दिवसापासून भिंगार शहरातील बाजारपेठ व इतरत्र मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. दुकानदार भाजी विक्रेते यांच्या दुकानाची नासधूस करतात. बाजारपेठेत खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांची वाहने पडतात त्यांचे नुकसान करतात. या जनावरांचे शेण तेथील जागी पडले तरी उचलले जात नाही त्यामुळे नागरिक घसरून पडतात. आता पावसाळा असल्यामुळे ओलावा असल्यास त्या शेणाची दुर्गंधी पसरते. बाजारपेठेत विखरुन पडलेल्या खाद्यपदार्थासह इतर वस्तू खाण्याच्या नादात दोन मोकाट जनावर आली अन त्यांच्यात मोठ्या प्रमाणात झुंज लागली. त्यांच्या या धुडगूस घालण्याने विक्रेत्यांची नासधूस झाली. दरम्यान यावेळी लागलेल्या झुंजीत बाजारपेठेतील व्यावसायिकांचे नुकसान झाले. झुंज व बैलांची अवस्था पाहून अनेक नागरिकांनी त्यांना अटकाव करण्यासाठी प्रयत्न केला असता, मात्र दोन्हीही जनावरे नागरिकांच्या अंगावर धावून जात असल्याने लागलेली झुंज सोडवण्यासाठी अडथळा ठरला. दरम्यान यावेळी बाजारात असणाऱ्या भाजी विक्रेते व नागरिकांत घबराट पसरली होती. भाजी विक्रेते तथा व्यावसायिक यांनी यापूर्वी स्थानिक प्रशासनाने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा अशा मागणी केली होती. मात्र याकडे स्थानिक प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने भाजी विक्रेते व्यावसायिक यांच्यात तीव्र संतापाची लाट पसरली आहे. विशेष म्हणजे शहरातील आठवडी बाजार तसेच दररोजच शहराच्या बाजारपेठेसह इतर भागात मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. सदरील झुंजीमुळे बाजारपेठेतील काही विक्रेत्यांचे नुकसान झाले आहे. यात जर नागरिकांना इजा होऊन काही हानी झाली असती तर याला जबाबदार कोण असते हा प्रश्न भाजी विक्रेते व्यावसायिकांमधून विचारला जात आहे.

#### भाजी विक्रेते आणि व्यावसायिकांचा सवाल

यावर स्थानिक प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून वेळीच मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

# बदली करिता अर्ज केलेल्या 'त्या' शिक्षकांच्या कागदपत्र तपासणी कमिटीवर विश्वास नसून आक्षेप

### जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या वतीने निवेदन



चंद्रशेखर पंचमुख

नगर – शिक्षण खात्यातील संवर्ग एक मधून बदली करिता अर्ज केलेल्या कर्मचाऱ्यांच्या फक्त कागदपत्र तपासणी करणाऱ्या कमिटीवर आक्षेप घेत सर्व तपासण्या इन कॅमेरा करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष चंद्रशेखर पंचमुख यांच्या वतीने जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, सन २०२५ मध्ये शिक्षकांची बदली प्रक्रिया सुरू आहे संवर्ग एक मधून अनेकांनी आपल्या अर्ज केले आहे व त्या अर्जांना कागदपत्र पडताळणी समितीने कोणतीही बारकाईने पाहणी तपासणी न करता समिती देऊन त्यांना बदली प्रक्रियेमध्ये समाविष्ट केले आहे. याबाबत वेळोवेळी शिक्षणाधिकारी यांना पत्र देऊन निवेदने देऊन परंतु त्यांनी ही गोष्ट गांभीर्याने न घेता जाणून–बुजून दुर्लक्ष केले आहे. संवर्ग एकचा लाभ घेण्याकरिता अनेक शिक्षक शिक्षिका कागदोपत्री अपंग झाले आहे त्यांनी गैर मार्गाने अपंगाचे प्रमाणपत्र मिळवलेले आहे संवर्ग एक मधून अपंग म्हणून ज्यांनी बदली अर्ज केला आहे त्या सर्वांची शारीरिक तपासणी जेजे रुग्णालयातून करण्यात यावी तसेच त्यांचे कागदपत्रे तपासणीची जबाबदारी आरोग्य यंत्रणाकडे देण्यात यावी. यामुळे खोटे अपंग उघड होतील त्यांना पाठीशी घालणारे अधिकारी समोर येतील त्यामुळे संवर्ग एक मधून घटस्फोटीत व परितक्या या नावाखाली अनेक महिलांनी खोटी माहिती पुरून नोटरीवर परितकत्या असल्याचे दाखवले आहे या महिला कुटुंब वत्सल्य असून आपल्या पतीसोबत राहतात व फक्त लाभापोटी परितकत्या झाल्या आहेत या महिलांची कोणतीही उलट तपासणी न होता फक्त नोटरीच्या आधारे बदली मध्ये समाविष्ट केलेले आहे त्यामुळे या महिलांनी जर वर्ष दोन वर्षांपूर्वी किंवा त्यापूर्वी जर नोटरी करून परितकत्या असल्याचे दाखवले असेल तर मग त्यांनी याची तक्रार न्यायालयात पोलीस ठाण्यात व दिल्याचा सेलमध्ये का केली नाही कोणतीही महिला एवढा जास्त वेळ फक्त परितक्त्या नसते ती घटस्फोट घेते नाही तर पुन्हा पुन्हा एकत्र येतात या महिलाना कोणतेही कारण नसताना फक्त घराजवळ शाळा मिळावी म्हणून असे खोटे दाखवत आहे याबाबत पोलीस यंत्रणेकडून अशा महिलांची चौकशी करावी खोट्यापरिताक्त्याचा खूप मोठा रॅकेट उघड होईल व त्याचप्रमाणे अनेकांनी घटस्फोटीत असल्याचे प्रमाणपत्र दाखवले आहे त्यातील पुष्कळ महिलांनी पुनर्विवाह केला आहे त्यांचा नव्याने संसार चालू आहे परंतु या महिला जाणीवपूर्वक लाभासाठी आपले जुनेच प्रमाणपत्र दाखवून बदलीचा लाभ घेत आहे त्यामुळे या महिलांचा देखील तपास पोलीस मार्फत लावण्यात यावे व शिक्षण विभागाच्या वतीने नेमलेल्या तपासणी कमिटीवर अजिबात विश्वास नसून या अगोदरही त्यांनी डोळेझाक करून अशा खोट्यांना अभय दिलेला आहे तरी या सर्व तपासण्या इन कॅमेरा व्हाव्यात व या विषयांकडे गांभीर्याने घेऊन दखल घेण्यात यावी अन्यथा उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# मारहाण करून शारीरिक व्यंगावर शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी

### पिडीत अंध व्यक्तीची जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे धाव : कारवाईची मागणी; दिव्यांगाचे पीडित परिवार भयभीत



नगर – मारहाण करून शारीरिक व्यंगावर शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्यांवर दिव्यांग अधिनियम २०१६ प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याची मागणी जन्मजात अंध असलेले दीपक झोंबाडे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे तक्रार केली आहे. घरा जवळ राहत असलेले काही गुंड प्रवृत्तीचे लोक दिव्यांग असल्याने जाणीवपूर्वक त्रास देत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

जन्मजात अंध असलेले दीपक झोंबाडे मिरजगाव (ता. कर्जत) येथे कुटुंबीयांसह राहत आहे. त्यांच्या घरात वयोवृद्ध आई–वडील असून, त्यांची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर आहे. त्यांच्या राहत्या घरासमोर वहिवाटीचा रस्ता आहे. घरा जवळ राहत असलेले काही व्यक्ती त्यांच्या घरा समोर कचरा आणून टाकतात, त्यामुळे दुर्गंधीचा त्रास त्यांना सहन करावा लागत आहे. कचरा टाकणाऱ्यांना वेळोवेळी समजावून देखील ते ऐकत नाही विविध मार्गाने त्रास देत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

त्याच व्यक्तींनी घरासमोर सांडपाणी सोडल्याने मुले घसरून पडली, याबाबत विचारणा केली असता त्यांनी गचंडी धरून मारहाण केली व दिव्यांगत्वावर हिनावून जीवे मारण्याची धमकी दिली. भांडणे सोडवण्यास आलेल्या आई–वडिलांना देखील त्यांनी मारहाण केली. या प्रकरणाने सर्व कुटुंबीय भयभीत झाले आहे. मिरजगाव पोलीस स्टेशनला फिर्याद दिली असता, संबंधित पोलिसांनी फिर्याद न घेता माघारी पाठवले. पोलीस स्टेशनला फिर्याद देण्यासाठी गेल्याचा राग येऊन सदर व्यक्तींनी ८ जून रोजी घरामध्ये घुसून जाळून मारण्याची धमकी दिली असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

वेळोवेळी त्रास देऊन मारहाण करणारे गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींपासून जीवितास धोका असून, त्यांच्यावर दिव्यांग अधिनियम कायदा २०१६ नुसार आजामीनपात्र गुन्हा नोंदवावा व ट्रॉसिटीचे कलम लावण्याची मागणी दिव्यांग असलेले दीपक झोंबाडे यांनी केली आहे.

# प्रभाग अधिकाऱ्यावर तातडीने निलंबनाच्या कारवाईसाठी आंदोलन करण्याचा इशारा



संतोष साळवे

नगर – महापालिकेच्या बोल्हेगाव प्रभाग कार्यालयातील प्रभाग अधिकारी कधीही कार्यालयात उपस्थित नसतात, त्यामुळे नागरिकांची कामे खोळंबली आहेत. या प्रभाग अधिकाऱ्यांवर तातडीने निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करत १५ दिवसांत कारवाई न झाल्यास महापालिकेत आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने देण्यात आला आहे.

याबाबत शहर सचिव संतोष साळवे व शहर उपाध्यक्ष संकेत व्यवहारे यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे. त्यात म्हंटले आहे की, बोल्हेगाव कार्यालयातील प्रभाग अधिकारी कोणत्याच कार्यालयीन कामासाठी उपस्थित नसतात. बोल्हेगाव येथील संभाजीनगर येथील काही घरांच्या नोंदणी करण्यासाठी आम्ही प्रभाग अधिकारी यांना दोन महिने झाले संपर्क करत आहोत मात्र ते अद्यापपर्यंत भेटलेले नाहीत. जे काही लोक घर घेतात त्यानंतर आपल्या अहिल्यानगर महापालिकेची घरपट्टी व पाणीपट्टी साठी हस्तांतरणाचा फॉर्म जोडून द्यावा लागतो. पण त्यासाठी आधीची घरपट्टी ही भरलेली लागते.

ही घरपट्टी भरण्यासाठीच आम्ही जे प्रभाग अधिकारी आहेत त्यांना वारंवार संपर्क केला असता त्यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही. जे काही खरेदी खत असते त्यामधील १ टक्का कर हा महापालिकेमध्ये भरावा लागतो. त्या पैशातून आपले महापालिकेचे कामकाज चालू राहते. नागरिक १ टक्का कर भरण्यास तयार आहेत, पण आपले जे प्रभाग अधिकारी आहेत ते कोणत्याही प्रकारचे नागरिकांना सहकार्य करत नाहीत व तिथे काम मार्गी लावत नाहीत. यामुळे नागरिकांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सदरील जो कोणी बोल्हेगाव परिसरातील प्रभाग अधिकारी असेल त्यावर निलंबनाची कारवाई करून तेथे सक्षम अधिकारी नियुक्त करण्यात यावा. पंधरा दिवसात निलंबनाची कारवाई जर झाली नाही तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे महापालिकेत आंदोलन केले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# शिक्षक, शिक्षकेतरांना थकीत वैद्यकीय व पुरवणी देयके तातडीने मिळावी

### मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर समन्वय समितीची मागणी; वेतन पथक अधीक्षकांचे टॅब सुरु करण्याचे आश्वासन



शिक्षक, शिक्षकेतरांना थकीत वैद्यकीय व पुरवणी देयके तातडीने मिळावी, या मागणीचे निवेदन वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के यांना देताना संघटनेचे शिष्टमंडळ.

नगर – शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे थकीत वैद्यकीय व पुरवणी देयके तातडीने मिळावे व मार्च २०२५ पूर्वीच्या भविष्य निर्वाह निधीच्या (पीएफ) पावत्या मिळण्याची मागणी मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर समन्वय समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के यांची भेट घेऊन निवेदन दिले.

याप्रसंगी मुख्याध्यापक संघाचे सचिव प्राचार्य संभाजी पवार, शिक्षकेतर संघटनेचे पुणे विभागीय सचिव गोवर्धन पांडुळे, शिक्षक वैभव सांगळे, संभाजी बेलोटे, विनोद सोनसळे, भाऊसाहेब भडांगे, गवळी, ए.जी. आचार्य आदी उपस्थित होते. शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी वेतन पथक अधीक्षक म्हस्के यांच्याशी फोनवर सदर प्रश्नासंदर्भात चर्चा करुन प्रश्न सोडविण्याच्या सूचना केल्या. यावेळी म्हस्के यांनी वैद्यकीय बिलांचे टॅब तातडीने सुरू करण्याचे तसेच थकीत बिलासाठी देखील टॅब सुरू करुन देण्याचे आश्वासन दिले.

जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या स्वतःचे तसेच कुटुंबातील सदस्यांचे आजारपणासाठी केलेल्या खर्चाचे वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके १५ मार्च २०२५ पासून शिक्षण संचालकांच्या आदेशान्वये थांबविण्यात आलेले आहेत. तथापि जून महिना संपत आला असतानाही शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके अदा करण्यात आलेले नाही.

जिल्ह्यातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाणी निधी ना परतावा आग्रीम रक्कम मिळण्यास विलंब होत आहे. कर्मचारी त्यांच्या मुला–मुलींचे लग्न कार्यासाठी, आजारपणासाठी तसेच पाल्याचे उच्च शिक्षणासाठी अग्रीम रकमेची मागणी करतात. असे असताना अनेकांचे लग्न होऊन गेले तरी संबंधित अग्रीम रक्कम मिळत नाही. अनेक प्रकरणे पडून आहेत, काही प्रकरणे लगेच निकाली काढली जातात. प्रथम आलेल्यांना प्राधान्य देऊन ही प्रकरणे निकाली काढली जाण्याचे निवेदनात म्हटले आहे.

शिक्षक शिक्षकेतरांना मार्च २०२५ पर्यंतचे ऑनलाइन भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या अद्यापि मिळालेल्या नसल्याचे स्पष्ट करुन, थकीत वैद्यकीय व पुरवणी देयके तातडीने मिळावे व मार्च २०२५ पूर्वीच्या भविष्य निर्वाह निधीच्या (पीएफ) पावत्या मिळण्याची मागणी मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर समन्वय समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

आजारपणात मोठा आर्थिक खर्च सोसावा लागतो. कॅशलेस उपचाराची सुविधा नसल्याने शिक्षकांना हॉस्पिटलला रोख रक्कम भरुन, या देयकांचे बील जमा करुनही महिनोमहिने निघत नाही. कुटुंबाची जबाबदारी व झालेला खर्चामुळे आर्थिक परिस्थिती ढासळते. भविष्य निर्वाणी निधीची आग्रीम रक्कमही वेळेवर मिळत नसल्याने शिक्षक गरजेच्या वेळी आर्थिक संकटात सापडत असून, संबंधित प्रशासनाने तात्काळ सदरचे प्रश्न सोडवावे, असे वैभव सांगळे यांनी सांगितले.

# गॅस टाकीची गळती व स्फोट दुर्घटनेतील पीडितांना नुकसान भरपाईसाठी उपोषण

### कंपनी व संबंधित एजन्सीवर गुन्हे दाखल करा, ७ वर्षापासून कुटुंबीय भरपाईच्या प्रतिक्षेत



श्रीरामपूर येथे २०१७ मध्ये झालेल्या हिंदुस्तान पेट्रोलियम गॅस टाकीची गळती व स्फोट होऊन दुर्घटनेत जबाबदार असणाऱ्या एचपी गॅस कंपनीकडून पीडित कुटुंबीयांना नुकसान भरपाई मिळण्याच्या मागणीसाठी सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले.

नगर – श्रीरामपूर येथे २०१७ मध्ये झालेल्या हिंदुस्तान पेट्रोलियम गॅस टाकीची गळती व स्फोट होऊन दुर्घटनेत जबाबदार असणाऱ्या एचपी गॅस कंपनीकडून पीडित कुटुंबीयांना नुकसान भरपाई मिळण्याच्या मागणीसाठी सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले. तर कंपनी व संबंधित एजन्सीवर गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्याचे म्हटले आहे.

संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या उपोषणात प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, जिल्हा सचिव हजरत शेख, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, छावा संघटनेच्या मालनताई जाधव, दत्ता वामन, प्रमोद जौंजाळ, कविता जौंजाळ, सचिन जौंजाळ, नंदाबाई शेंडे, सोनल जौंजाळ, विशाल जगताप, सिद्धांत पाटोळे आदी सहभागी झाले होते.

श्रीरामपूर येथे २४ डिसेंबर २०१७ रोजी हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन या कंपनीच्या गॅस टाकीची गळती व मोठा स्फोट होऊन मोठी दुर्घटना झाली होती. यामध्ये पाच कुटुंबीयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. गौरव बागुल यांच्यासह चंद्रकांत जौंजाळ, सचिन जौंजाळ, प्रमोद जौंजाळ, मधु बागूल यांच्या गृहपयोगी साहित्य आणि मंडप डेकोरेशनचे साहित्य, मंडप, डीजे सिस्टिम आदी महागड्या वस्तू जळून खाक झाले होते. यामध्ये सदर कुटुंबीयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. पीडित कुटुंबाने वेळोवेळी गॅस एजन्सीकडे तक्रार व पाठपुरावा करून नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे. परंतु त्यांनी आजपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही.

पोलिसांचा, तलाठी व तहसीलदार यांचा पंचनामा तसेच ग्रामपंचायत कार्यालय दत्तनगर श्रीरामपूर यांनीही दुर्घटनेचा दाखला दिलेला आहे. श्रीरामपूर नगर परिषदेचे अग्निशमन वाहनांनी सुमारे एक तास प्रयत्न करून आग विझवली. याबाबत अग्निशमन कर्मचाऱ्यांनी पीडितांकडे बिलाची मागणी केली असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

हिंदुस्तान पेट्रोलियम गॅस टाकीची गळती व स्फोट होऊन दुर्घटनेत जबाबदार असणाऱ्या एचपी गॅस कंपनीकडून पीडित कुटुंबीयांना नुकसान भरपाई मिळावी आणि दुर्घटनेला कारणीभूत असलेल्या कंपनी व गॅस एजन्सीवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी छावा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.



शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करावी व सातबारे कोरे करावे, या मागणीसाठी राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले आहे.

# राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करून सातबारा कोरा करण्याच्या मागणीसाठी उपोषण

नगर – महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करून सातबारा कोरा करण्याच्या म ागणीसाठी राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करताना जिल्हा अध्यक्ष आत्माराम कुंडकर, उपजिल्हाध्यक्ष नंदकुमार खेमनार, जिल्हा संपर्कप्रमुख नानासाहेब जुंधारे, बिलाल शेख, मुनीर शेख, गोवर्धन शेळके, जितेंद्र वाघ, सुनील शिंदे, अनिस सय्यद, युसुफ सय्यद, अशोक मुळे, अभिषेक कुंडकर, महेश गवळी, नितीन गायकवाड, वंदना आढाव, दादासाहेब कुसेकर, आर्यन खिल्लारे, संकेत गायकवाड, बापू बिरके, प्रल्हाद पाटील, शहाजी कोरडकर, भगवान करवर, मंदाकिनी बडेकर, शहाजी सरक, शिवदास पिसाळ, तात्या गोसावी, मिनीनाथ थोरात, केशव सरक आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, केंद्र सरकारने जाहीर केलेल्या अहवालानुसार शेतकऱ्यांपेक्षा शेतमजुरांची उत्पन्न जास्तीचे आहेत. शेती करणे नुकसानीचे बनले आहे. महाराष्ट्र मध्ये दिवसाला ८ शेतकऱ्यांची आत्महत्या होत आहे. अशा काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीपूर्वी जाहीर केले होते की. आमचे सरकार आल्यास शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणार आज हे धाडस दाखवण्याची वेळ आली आहे. मुख्यमंत्र्यांनी समिती स्थापन करत वेळ काढून पणा करू नये उद्योगपतींचे १६ लाख कोटी रुपयांची कर्ज राईट ऑफ करताना समिती स्थापन केली जात नाही. पण ३६ लाख शेतकऱ्यांना २५ हजार कोटीची कर्जमाफी करताना समितीचा हट्ट कशासाठी? मेट्रो ट्रेन साठी १ लाख ८ हजार कोटीची तरतूद करू शकतात शेतकऱ्यांच्या विरोध असताना ८६ हजार कोटी शक्तिपीठ महामार्गासाठी दिले जातात व ३६ हजार कोटी लाडक्या बहिणीसाठी दिले जातात मग शेतकऱ्यांना आश्वासन देऊन दुर्लक्षित केल्याने आत्महत्याच प्रमाण वाढल आहे. याला सर्वस्वी जबाबदार कोण? त्यामुळे लवकरात लवकर सरकारने सरसकट कर्जमाफी करावी व सातबारे कोरे करावे व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करत सातबारा कोरा करावा या मागणीसाठी राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले आहे.

